दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

## रविवार पुरवणी १६ जून २०२४



जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

# एसटी'चा प्रवास !

राज्य परिवहन महामंडळाच्या एसटीने नुकतीच वयाची ७५ वर्षे पूर्ण करून ७६ व्या वर्षात पदार्पण केले आहे. ३६ गाड्यांसह सुरु झालेल्या एसटीचा प्रवास आहे राज्यभरात अविरत सुरु आहे. आजमितीला १८ हजाराहून अधिक गाड्या महामंडळात सेवा देत आहेत. शहरी भाग सोडला तर एसटी हा ग्रामीण भागातील नागरिकांचा नेहमीच जिवाभावाचा विषय ठरला आहे. तालुक्यात शिक्षणासाठी प्रतिदिन जाणारी शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळी असो वा आठवडी बाजारात खरेदीसाठी जाणारी ग्रामस्थ मंडळी असो, माहेरी पाहुणचार घेण्यासाठी आलेली नवविवाहिता असो वा नोकरी व्यवसायानिमित्त दैनंदिन प्रवास करणारी मंडळी असो सर्वांनाच इच्छित स्थळी नेण्याचे आणि आणण्याचे काम आजवर राज्य परिवहन महामंडळाच्या लालपरीने केले आहे.



एसटीचे चालक-वाहक आणि एसटीने नियमित प्रवास करणारी मंडळी यांच्यामध्ये एक अतूट नाते निर्माण झाले आहे. नेहमीची व्यक्ती स्थानकावर दिसली नाही कि एसटीच्या वाहकालाही चुकल्याचुकल्या सारखे वाटते. एसटीच्या चालकांनाही नेहमीच्या रस्त्यातील खड्डे, गतिरोधक, वळणे अगदी तोंडपाठ झालेली असतात त्यामुळे एखाद्या ठिकाणी अधिक प्रवासी चढले उतरले तरी नेहमीच्या थांब्यांवर एसटीची यायची वेळ सहसा चुकत नाही. आज जी कोकण रेल्वे भरभरून वाहते आहे हा सारा भार पूर्वी एसटी आपल्या अंगा खांद्यावर वाहत होती. आजमितीला ज्या गावात अन्य वाहने पोहोचली नाहीत अशा गावांतही एसटीचे जाळे पसरले आहे.

आजही सुट्टीत शहरातून गावाला जायचे म्हटले तर रेल्वे स्थानकावर उतरल्यावर पुढचा प्रवास अनेकांना एसटीनेच करावा लागतो. वाढत्या महागाईसोबत लोकांची मिळकतही वाढली, मिळकत वाढल्याने राहणीमानही बदलत गेले, त्या अनुषंगाने परिवहन महामंडळातही अधिक सोयी आणि सुविधा पुरवणारे बदल झाले. शहर वाहतुकीत वातानुकूलित गाड्या आल्या तशा राज्य परिवहन महामंडळातही गारेगार प्रवासाचा अनुभव देणाऱ्या वातानुकूलित गाड्यांचा प्रवेश झाला. या गाड्यांना राज्यातील नागरिकांनीही भरभरून प्रतिसाद दिला आणि आजही देत आहेत. आता तर इलेक्ट्रिक बसेसही महामंडळात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रदूषण नियंत्रणातही एसटी हातभार लावत आहे.

राज्य सरकारने महिला प्रवाशांसाठी तिकीट दरात ५० टक्के सूट दिल्यामुळे महिला प्रवाशांची संख्या कमालीची वाढली आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आता महिला वाहकही एसटी गाड्यांतून जागोजागी दिसू लागल्या आहेत. रस्त्यांचे जाळे गावागावांत पसरले असले तरी सर्वच रस्ते गुळगुळीत आहेत असे नाही. अनेक ठिकाणी मातीच्या कच्च्या रस्त्यांतून एसटीला प्रवास करावा लागतो. आजमितीला राज्यातील अनेक भागांत रस्ता रुंदीकरणाची आणि दुरुस्तीची कामे सुरु आहेत अशा वेळी खडकाळ रस्त्यातून मार्ग काढत लालपरी नागरिकांना इच्छित स्थळी पोहोचवण्याचे कार्य अविरतपणे करत आहे.

आजमितीला अनेक भागांत मोठ्या प्रमाणात प्रवासी उपलब्ध असताना त्या भागांत एसटीच्या दिवसातून केवळ २ ते ३ फेऱ्या होतात. मधल्या काळात स्थानिक वडापवाले कोंबून प्रवाशी भरून बक्कळ पैसे कमावत असतात. राज्यातील जवळपास सर्वच एसटी डेपोच्या बाहेर वेगवेगळ्या मार्गाने प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या काळी पिवळी गाड्यांचा समूह प्रवाशांना हातवारे करत बोलावताना दिसून येतो. या ठिकाणी एसटी बसेस जाऊ शकत नाहीत का ? दरवर्षी एसटी महामंडळ तोट्यात असल्याचे दाखवण्यात येत असले, तरी एसटीला नफ्यात आणण्याचे उपायसुद्धा एसटीकडेच आहेत. आज - मितीला एसटी महामंडळाकडे असलेला बस गाड्यांचा ताफा राज्याच्या वाढत चाललेल्या लोकसंख्येच्या तुलनेत खूपच अल्प आहे. काही मार्गांवर धावणाऱ्या एसटी बसेसची संख्या कमी असल्याने जेव्हा केव्हा या गाड्या थांब्यावर येतात तेव्हा प्रवासी त्यावर तुटून पडतात. एकमेकांना मागे टाकत बसमध्ये बस ण्यासाठी जागा मिळवण्याच्या संघर्षात महिला, लहान मुले, वयोवृद्ध यांचे अतोनात हाल होतात. सणासुदीच्या काळात महामंडळाकडून जादा गाड्या सोडूनही त्यासुद्धा कमी पडतात, ज्याचा लाभ खासगी ट्रॅव्हल्स आणि ट्रान्सपोर्ट कंपन्या घेतात, इच्छित स्थळी जाण्यासाठी प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा भाडी आकारतात. एसटी उपलब्ध न झाल्याने प्रवाशांना नाईलाजाने या लुटीचा सामना करावा लागतो.

कालानुरूप अद्यावत होत असणारे एसटी महामंडळ वाढत्या लोकसंख्येनुरुप गाड्यांची संख्या का वाढवत नाही ? गाड्या वाढल्या कि प्रवाशांची सोय तर होणारच आहे शिवाय अनेकांना रोजगारही उपलब्ध होणार आहेत. गेल्याच वर्षी जुलै मासात छप्पर उडालेल्या एसटीचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. आजही अनेक एसटी बसेसमध्ये आसने मोडलेली दिसून येतात, खिडकीच्या काचा पुढे मागे सरकत नाहीत, पावसाळ्यात छत गळत असते, बाहेरील बाजूने पत्रे वाकलेले अथवा बाहेर आलेले असतात. गाड्यांचे सस्पेन्शन ढिले झालेले असते. एसटी बस थांब्यावर येते तेव्हा ती कुठे जाणार आहे याबाबतचा फलक बऱ्याचदा लावलेला नसतो, काही वेळा वाहकांचे प्रवाशांशी बोलणे उर्मटपणाचे असते.

एसटी आगाराच्या स्थितीबाबत तर बोलायलाच नको. एसटी आगाराच्या भिंती, प्रसाधनगृह गुटखा-पान खाऊन प्रवाशांनी रंगवलेल्या दिसून येतात, अनेकदा प्रसाधनगृहात पाणी नसते, आगारांमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था दिसून येत नाही, असलीच तर त्या ठिकाणची अस्वच्छता पाहिल्यावर बाहेर विकत घेऊन पाणी पिणे सोयीचे वाटते, एसटी आगारात असलेल्या उपहारगृहात नेहमीच पदार्थांची वानवा असते.

प्रवाशांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेल्या चौकशी कक्षातील कर्मचारी प्रवाशांशी उद्धटपणे बोलत असतात. एखाद्या आगाराचे दुरुस्तीचे काम काढले तर ते पुढे वर्षोनुवर्षे चालूच असते. एसटी महामंडळ हा एक सेवाभावी उपक्रम आहे. या उपक्रमातील त्रुटी दूर करून ग्राहकांचा प्रवास सुलभ आणि सुखकर व्हावा यासाठी राज्य सरकार काही प्रयत्न करणार आहे का ?

मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.

# बाळूचा गाव

तब्बल तीस वर्षांनी बाळुने गावची वाट धरली. गेल्या तीस वर्षांत बाळुला गावाकडे कधी जावेसेच वाटले नाही. पोटापाण्यासाठी मुंबईत गेलेला बाळू तिथेच स्थिरावला. गाव कसे असते? गावाकडची दररोज फोनवर बोलणारी, आपुलकीने गप्पा मारणारी माणसे प्रत्यक्षात कशी आहेत याविषयी बाळुच्या मुलांना फार उत्सुकता होती. बाळू रात्री सहकुटुंब कोकण रेल्वेत बसला आणि पहाटेस कणकवली स्थानकात उतरला. कणकवली स्थानकात उतरल्यावर बाळू मोहरून गेला. पुर्वीचे स्थानक आता पार बदलून गेले होते. स्थानकातून बाहेर पडताना मधुभाई दंडवतेंच्या तैलचित्राने बाळुचे लक्ष वेधून घेतले. हातातले बोजा खाली ठेवून त्याने चक्क मधुभाईना साष्टांग दंडवतच घातला. स्थानकातून आत बाहेर पडणारे सहप्रवासी त्याच्याकडे बघत राहिले. पण बाळुला त्याचे काही वाटले नाही. त्याने मुलांनाही तसेच करायला सांगितले. बायकोकडे बघत तो म्हणाला,' हे कोकण रेल्वेचे शिल्पकार, मधुभाई दंडवते. केवळ यांच्यामुळेच भारतीय रेल्वे कोकणात धावत आहे.' स्थानकाच्या बाहेरच उभ्या असलेल्या 'कणकवली-आचरा' बसमध्ये चढल्यावर त्याला गावाची ओढ स्वस्थ बसू देईना. कसा असेल माझा गाव? तसाच असेल की बदलला असेल? बिघडला तर नसेल ना? सारखे असंख्य प्रश्न त्याच्या मनात येत राहिले.

बाळुचे गाव तसे मुख्य हमरस्त्यावरच होते. गावातील प्रसिध्द 'वाकडा पूल' थांब्यावर तो उतरला तेव्हा चांगलीच सकाळ झाली होती. सूर्यही काहीसा डोंगरावर आला होता. सकाळ सकाळचे वाकडापुलावरचे वातावरण अतिशय शांत व प्रसन्न दिसत होते. पण बाळुला वाकडापुलाचा परिसर फारच बदलल्यासारखा दिसला. पुर्वी एखाद्या मोरीसारखा दिसणारा पूल आता सिमेंट कॉन्क्रिटचा व लांब, रुंद झाला होता. बाळुने पुलावरुन खाली डोकावून पाहिले. पूल पक्का झाला होता पण पुलाखालच्याच्या वहाळात पाणी कुठे होते? 'पुर्वी बारमाही खळखळ वाहणारा तो वहाळ कोरडा ठणठणीत कशाने बरे झाला असेल? गावाकडे पाऊस वगैरे पडतो की नाही?' बाळुच्या मनात प्रश्नांचे जंजाळ परत वळवळू लागले. परंतु नवीन बांधलेला वाकडा पूल, पुलाकडून गावात जाणारी गुळगुळीत डांबरी सडक, पुर्वी या परिसरात चिटपाखरुही राहत नव्हते. पण आता समोर दिसणारी दुकानांची रांग, पुलावरच एका कोपऱ्यात उभ्या असलेल्या तीन चार रिक्षा पाहून बाळुला आनंद झाला. ' म्हणजे 'विकास' आपल्याही गावात पोहोचलाय तर!' नकळत त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले.

योगायोग असा की, तो ज्या रिक्षात बसला तो रिक्षावाला त्याचा वर्गमित्र होता. इयत्ता पहिलीपासून ते दहावीपर्यंत एकाच बेंचवर बसणारे ते दोघे. आपल्या 'बेंचमेट'ला कडकडून मिठी मारीतच बाळू रिक्षात बसला. तब्बल तीस पस्तीस वर्षांनंतर अशी अवचित भेट झाल्याने दोघेही भारावून गेले. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या.  जुन्या आठवणी जाग्या झाल्या. बाळुने इकडे तिकडे पाहिले तर गाव पार बदलून गेला होता. पुर्वी ज्या ठिकाणी संध्याकाळी कापावर फिरकण्यासही सारे घाबरायचे, तेथे ठिकठिकाणी टुमदार बंगले उभे राहिले होते. मस्तपैकी बंगला, कंपाऊंड, गेट, बाग बगीचा सारे काही शहरासारखेच दिसत होते. काही ठिकाणचे मोकळे 'प्लॉट्स्' सोडले तर गावपण कुठेच दिसत नव्हते. बाळुच्या मनात आले, 'पुर्वी वाकडापुलावर बसमधून उतरलो की श्यामुची बैलगाडी चाकरमान्यांची वाट बघत उभी असायची. बैलगाडीतून घुंगरांचे मधुर स्वर कानांत साठवीत चाकरमानी आपापल्या घरापर्यंत जायचे. पण आज पुलावर ना श्यामुची बैलगाडी, ना कापावर श्यामुने बैलगाडी ठेवण्यासाठी बाधलेली चुडतांची शेड! गाव तर फारच बदलले आहे बुवा!' श्यामुची ती चुडतांची 'शेड' म्हणजे तत्कालीन वास्तुकलेचा अनमोल नमुना होता. केवळ जंगली मेडी, चिवारीच्या काठ्या आणि माडाच्या चुडतांपासून दरवर्षी श्यामू कापावर त्याच्या नेहमीच्या जागी अशी खोप उभी करायचा. पावसाळ्यात अचानक आलेल्या पावसात आसरा म्हणून अनेक वाटसरु याच खोपीचा आधार घ्यायचे. याच खोपीत बैलगाडी 'पार्क ' करून श्यामू बैलांना घेऊन पाणंदीतून घराकडे जायचा.

घरी गेल्यावर थोडा 'फ्रेश' होऊन बाळू मुलाला घेऊन घराबाहेर पडला. बाळुने त्याच्या बालपणात अनुभवलेला गाव निराळाच होता असे त्याला वाटू लागले. घराजवळून डोंगराकडे जाणारी पाणंद आता पाणंदीसारखी नव्हतीच मुळी. पाणंदीचा आता डांबरी रस्ताच झाला होता. शिवाय पुर्वी पाणंदीच्या दुतर्फा असलेले निवडुंगाचे, तिंजाऱ्याचे कुंपण आता कुठेच दिसत नव्हते. बाळू पुर्वी या कुंपणाला 'वय' म्हणायचा. कुंपणातून घराकडे जाण्यासाठीचे 'आकाडे'ही आता कुठे दिसत नव्हते. आकाडा बंद करण्यासाठीच्या 'तटक्या'ही त्याला कुठेच दिसल्या नाहीत. गावातील  पुर्वीची मधल्यांची, वयल्यांची, खायल्यांची, पांदीतल्यांची, भरडावयल्यांची, साकवातल्यांची घरे मातीची व कौलारु होती.



मात्र आता गावात क्वचितच दोन तीन मातीची घरे सोडली तर इतर सगळी घरे पक्की व चिरेबंदी झाली होती. प्रत्येक घरापर्यंत, अगदी खळ्यापर्यंत जाणारा रस्ता, गेट, खळ्यात फरशी, प्रत्येक घरात दोन तीन स्कुटर्स, एखादी चारचाकी असे सारे वैभव पाहून बाळू बुचकळ्यात पडला.

गावातली जुनी जाणती माणसे सोडली तर बाळुला तसे कोणी ओळखले नाही. तसे बाळुनेही अनेकांना ओळखले नाही. ज्यांनी ओळखले त्यांनी बाळुची अपुर्वाईने चौकशी केली. गावातला फेरफटका झाल्यावर बाळू महापुरुषाकडे गेला. पुर्वी महापुरुषाच्या पिंपळाला पार नव्हताच. आता तिथे मस्त पार, बाहेर मंडप झालेला बघून बाळुला आनंद झाला. गावातील माणसांप्रमाणेच गावातील देवस्थानांचेही राहणीमान सुधारले असल्याचे बाळुला पटले.बाकीच्या गोष्टी बदलल्या तरी महापुरुषाच्या पारावरचा डोंगराकडून येणारा वारा मात्र पूर्वीसारखाच 'वाहता' व खेळकर असल्याचे बाळुला जाणवले. महापुरुषाभवती एक प्रदक्षिणा घालून बाळू व मुलगा दोघेही पारावर बसले. बाळू मुलाकडे बघत म्हणाला,' याच महापुरुषाच्या सान्निध्यात आम्ही दुपारी, रात्री मस्त वाऱ्यावर झोपून जायचो. एकदा तर रात्री आडव्याच्या रानातून पाणी पिण्यासाठी उतरलेला वाघ आमच्या अगदी जवळून गेला होता. पण त्याने आम्हाला काहीही केले नाही.'

 दुपारनंतर उन कोवळे झाल्यावर बाळुने मित्राची फटफटी बाहेर काढली. फटफटीवर बसून बापलेक सड्याकडे निघाले. बाळुच्या बालपणी ना बाळुच्या मित्रांकडे फटफट्या होत्या, ना सड्यावर जाण्यासाठी रस्ता होता. दगड धोंड्यांची घाटी पायी चढूनच पुर्वी ही घाटी चढून सड्यावर जावे लागायचे. वर्षभरात तसे दररोजच या घाटीने सड्यावर जाण्याची वेळ यायची. गुरांना सड्यावर घेऊन जा, लाकूडफाटा आणा, करडाच्या वरंडी (गवत) आणा, याशिवाय पावसाळ्यात सड्यावरच्या डबक्यांतील कातळातील बिळांतले खेकडे पकडण्यासाठीही बाळू सड्यावर नेहमीच जायचा. सड्यावरचा विस्तीर्ण निसर्ग पावसाळ्यात, पुढे दिवाळीपर्यंत फारच सुंदर दिसतो. सह्याद्रीच्या कांस पठारालाही लाजवील इतके सौंदर्य या सड्यावर पहावयास मिळते. पावसाळ्यात बाळुच्या गावचा हा सडा खरेच पृथ्वीवरील स्वर्ग दिसतो. पण आज बाळुला हा सडा पार बदलून गेल्यासारखा दिसला. सड्यावरचा पुर्वीचा 'नजारा' बिघडला आहे असेच बाळुला वाटले. सड्यावरच्या पुर्वीच्या पायवाटा आता गवतात गडप झाल्या होत्या. पुर्वी कातळावर दिसणारे बैलगाड्यांच्या धावपट्टीचे 'ट्रॅक' आता अगदीच अंधुक झाले होते. सड्यावर आता चार पाच मोठ्या चिरेखाणी दिसत होत्या. चिरे कापणाऱ्या 'ट्रिलर्स' च्या आवाजांनी, डंपरांच्या आवाजांनी सड्यावरची शांतता हरवली होती. बाळू सड्यावरच्या रस्त्याने आणखी पुढे गेला तेव्हा त्याला पुर्वीच्या निर्जन सड्यावर गेल्या काही वर्षांत निर्माण झालेली 'भव्य टाऊनशीप' दिसली. एखादे छोटे नगर वसावे तशी ती दिसत होती. सड्यावर चक्क सिमेंट कॉन्क्रिटचे बंगले, बंगल्याच्या आवारातील गाड्या बघून बाळुने तोंडात बोट घातले. आपला गाव इतकाही बदलला असेल याचा विचारही बाळुने केला नव्हता. एकंदरीत पुर्वीचा सडा आता राहिला नव्हता. बाळू विचारात गढून गेल्यासारखा चेहरा करून माघारी वळला. गावाचे गावपण मात्र हरवत चालले असल्याची खंत बाळुच्या मनात सारखी टोचत होती. तो घरी आला तेव्हा दिवेलागण झाली होती. हातपाय धुवून देवासमोर दिवाबत्ती करण्याचे फर्मान आईने बाळुला सोडले. बाळू हातपाय धुण्यासाठी मोरीत गेला. तितक्यातच मोरीत हातपाय धुवून बाळुची बायको बाहेर आली. बाळुकडे बघत ती बाळुला म्हणाली,' अहो, तुमच्या गावातून एक चक्कर मारून आले. किती सुंदर आहे हो हा गाव!' बाळू काहीच बोलला नाही. हातपाय धुवून त्याने दिवाबत्ती केली. वळईत आई तांदूळ निवडीत बसली होती. आईकडे बघत बाळू म्हणाला,' आई, गाव आता पुर्वीसारखा दिसत नाही. गावा आता पुर्वीसारखा राहिला नाहीय!'



## साप्ताहिक सदर
# तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

**लेखिकेचा परिचय :**
**चित्रा नानिवडेकर या प्रथितयश लेखिका व संवेदनशील कवयित्री आहेत. समाजात वावरताना आपल्या अवती भवती दिसणाऱ्या, दैनंदिन जीवनात जगताना पावलोपावली संघर्ष करणाऱ्या स्त्रियांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न चित्रा नानिवडेकर आपल्या साप्ताहिक सदरातून करणार आहेत.**

## लग्नबंधन... ? की जंजाळ...!!! (भाग २)

लग्न न करता आपलं स्वातंत्र्य पुरेपूर उपभोगणाऱ्या 'सिंगल...पण हॅपी. ग्रुपवर ईराला घेऊन सुस्मिता आली होती.)

सुस्मिता आणि ईरा शांताताईंना भेटल्या. ईराच्या मनात खूप प्रश्न होते. आजकाल कित्येक तरुणी लग्नच नाकारून एकट्या राहणं पसंत करतात. त्यामागची काय काय कारणं असतील? एक सुजाण आणि परंपरा जपणाऱ्या ईराला मनातून वाटतं की ह्यामुळे आपल्या संस्कृतीला, कुटुंब पद्धतीला भविष्यात धोका नाही का? एकटी सुस्मिताच असं नाही पण कित्येक फॅमिलीत मुली आणि हो मुलगे सुद्धा लग्नाचं वय उलटून गेलं तरी संसारा बद्दल उदासीन असतात.तिच्या आजूबाजूला अश्या कित्येक घरात लग्न ह्या गोष्टीबद्दल घाबरून लग्न लांबणीवर टाकणारे तरुण तरुणी, करियर मुळे, योग्य जोडीदार निवडता निवडता वय निघून चाललेले तरुण तरुणी, आवास्तव अपेक्षा ठेवून वधुवर सूचक मंडळाच्या फेऱ्यात अडकलेले पालक, परदेशी मुलांमुलीना कशा प्रकारे जोडीदार पाहिजे ह्या गोंधळात सापडलेले पालक. असे कित्येक प्रश्न ईराला सातावत होते. तिला पडलेल्या ह्या प्रश्नांची उत्तरं शांताताईंकडे असतील का?

शांताताईंनी शांतपणे ईराचं बोलणं ऐकलं.त्या स्वतः एका लग्नाच्या अनुभवातून पोळल्या असल्यामुळे आणि पेशाने मॅरेज कॉन्सिलर असल्यामुळे त्यांनी बऱ्याच वेगवेगळ्या प्रकारच्या केसेस पाहिल्या होत्या. रिटायरमेंट नंतर त्यांनी हा क्लब 'सिंगल...पण हॅपी' स्थापन केला. त्या म्हणाल्या....

"ईरा तूझं अस्वस्थ होणं स्वाभाविक आहे. पण गेल्या काही आपल्याकडे संगणक क्रांतीचा जो महापूर आला. त्यानंतर सगळं चित्र संपूर्ण बदललं. आपण जुन्या संकल्पनाना चिकटून आहोत. मुलीचं लग्न झालं, ती संसारात मग्न झाली की आपण इतिकर्तव्यातून मुक्त झालो. पण आजकाल मुलांना त्यांच्या करियरचा ग्राफ इतका उंचवायचा असतो की 'लग्न' ह्या विषयावर बोलायला सुद्धा त्यांना वेळ नसतो. मग मला सांग तू म्हणतेस तसं संस्कृती वगैरे टिकवण्याचा विचार त्यांच्या डोक्यात कुठून येणार? बरं त्यांच्या आयुष्यात तडजोड ह्या मुद्द्याला शून्य किंमत आहे. कारण आपण सुद्धा लहानपणा पासून त्यांना पाहिजे ते देत आलोय. आपली कारणं वेगळी होती...आम्ही स्ट्रगल केलं.. त्यांनी का करावं ह्या विचाराने आपण त्यांना वाढवलं. अगं, त्यांच्या प्रायोरिटीच वेगळ्या आहेत. तुझी कोण आहे का लग्नाची?"

"नाही...माझी मुलं शिकताहेत पण बहिणीची मुलगी 34 वर्षांची आहे. सुंदर, स्मार्ट, कमावती आहे. पण लग्नाचं बघायचं म्हटलं की बोलणं टाळते आणि ही आमची मैत्रीण...सुस्मिता. ताई मला काळजी वाटते की वय झाल्यावर ह्यांना एकटेपणा नाही का जाणवणार? म्हातारं झाल्यावर काय? माझी ताई नेहमी म्हणते आम्ही आहोत तोपर्यंत हिचे हात पिवळे व्हावे. आमच्यामागे हिला कोण बघेल."
"मग? भाची काय म्हणते?"
"ती म्हणते...मी लौकरच घर बुक करणार आहे. उलट तुम्हीच माझ्याकडे येऊन राहा. दादा वहिनीला करुदे त्यांचा संसार...बघा ताई ह्यांची उत्तरं पण तयार असतात."
"एक्झाकटली मला हेच सांगायचं आहे. त्या स्वतःला छान कंफर्ट झोन मध्ये ठेवतात. नाहीतर आपण संसारात इतक्या अडकतो की पुढच्या पिढीला जाचक वाटून सरतेशेवटी वृद्धाश्रमाची वाट धरतो. ह्यांनी आपली एकटं राहण्याची सोय आधीच केली असते.... खूप कंगोरे आहेत ह्यात. परत कधीतरी ह्या विषयावर बोलू."

ईरा त्यांच्याशी बोलून थोडी वेगळी दृष्टी घेऊन घरी आली. नवऱ्याशी सगळं बोलत असताना तो म्हणाला "अगं तू फक्त लग्न न केलेल्या मुलींचं म्हणतेस पण आमच्या टीम मध्ये मंदार आठवतोय. वय उलटून गेलेय. त्याला आलेले अनुभव ऐकलेस तर आश्चर्य वाटेल. एकूण काय लग्न, संसार हे आपल्या पिढी पर्यंत सिरीयसली असेल बहुतेक."
"अरे मी शांताताईंना घरी बोलावलं आहे.मंदारला पण बोलवू तेंव्हा.काय?"

**खरंच दिवसेंदिवस जटील होत चाललेला हा प्रश्न...तुम्हाला काय वाटत?**

---

### वाचकांच्या प्रतिक्रिया


या लेखावर अनेक वाचकांनी आपल्या उस्फुर्त प्रतिक्रिया पाठवल्या आहेत... त्यातील निवडक वाचकांसाठी प्रसिद्ध करत आहोत.

- **सुचिता कुलकर्णी**

खूप महत्वाचा विषय आहे हा ..वैशिष्ट्य: मुलींना लग्नाला कसा तयार करायचं तेच पूर्वीसारखी एकत्र कुटुंब पद्धती राहिली नाही...माणूस एकटा पडत चालला आहे....आपलं लग्न झाल्यावर आईवडिलांचं कास होणार या काळजीने मुली लग्नाचं करत नाहीत

(पान ७ वर)





# अध्यात्म

ज्योतिर्विद
उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४



## दहाव्याचा विधि

**( पुढील भाग)**

मागील भागात आपण दहाव्या दिवसाबाबत काही माहिती घेतली आहे. अंत्येष्टीकरणातील दहावा दिवस हा अत्यंत महत्त्वाचा असतो. पहिल्या दिवशी क्षौर केलेले नसल्यास क्षौर करून स्नानानंतर कर्त्याने दक्षिण दिशेला पुढा करून बसावे. प्राणायाम, नेत्राचमन करावे. पंचगव्य प्राशन करावे व अंगावर शिंपडून शुद्ध व्हावे तसेच सभोवतालची जागा शुद्ध करून घ्यावी. अंगावर ओले वस्त्र किंवा नवीन धोतर किंवा पंचा परिधान करावा. खांद्यावर उत्तरे घ्यावे. यापूर्वी सांगितल्याप्रमाणे दोन्ही कमरेकडील कनवट्या, शेंडी, उत्तरीय यांच्या ठिकाणी तीळ, अक्षता व दर्भ धारण करावे. पवित्रके धारण करावित. दक्षिणेकडे अग्र करून पसरलेल्या दर्भांवर बसावे.
समोर दक्षिण दिशेला एक साधारण ६० अंशाचा कोन करून मातीचा त्रिकोणी ओटा (वेदिका) करावा. त्यावर रांगोळी, हळद व कुंकू यांनी जमेल तसे नक्षीदार रेखांकन करावे. वेदिकेवर मध्यभागी दर्भ ठेवून त्यावर अश्मा (स्मशानात घट फोडण्यासाठी वापरलेला जीवखडा) ठेवावा. त्रिकोणी ओट्यावर दक्षिण आणि पूर्व दिशेच्या मध्ये (आग्नेय दिशेला) प्रेतसखी देवतेच्या स्थापनेसाठी दर्भ ठेवावा. उत्तर दिशेला प्रेताधिपती रुद्राच्या स्थापनेसाठी दर्भ ठेवावा. दक्षिण टोकाला वैवस्वत यमाच्या स्थापनेसाठी दर्भ ठेवावा तसेच पश्चिमेला वायसाच्या स्थापनेसाठी दर्भ ठेवावा. अशा रीतीने त्रिकोणी ओटीवर वेदिकेवर १) प्रेत देवता (दिवंगत व्यक्तीचा प्रेतात्मा), २) प्रेत सखी, ३) प्रेताधीपती रुद्र, ४) वैवस्वत यम व ५) वायस यांच्या स्थापनेसाठी दर्भ मांडून झाल्यानंतर पुढील प्रमाणे संकल्प करावा.

(उत्तरीय सव्य करावे) - ' वर्तमान विष्णुमय तिथी वार नक्षत्र करण योग तसेच वर्तमान संवत संवत्सर ऋतू अयन यांच्या सापेक्ष वर्तमान राशीस्थितीतील शुभ ग्रहस्थितीनुरुप विष्णुमय शुभकाले - मम आत्मन: श्रुती स्मृती पुराणोक्त फलप्राप्त्यर्थ (अपसव्य करावे) - '.. अमुक (दिवंगत व्यक्तीच्या गोत्राचे नाव घ्यावे).. गोत्रस्य.. अमुक (दिवंगत व्यक्तीचे नाव घ्यावे).. प्रेतस्य प्रेतत्व निवृत्त्यर्थ दशम दिन विधी तथाच दाह जनित तापोपशमनार्थ मृत्तिकास्नान करिष्ये ' - (हातावरून पाणी सोडावे).

(सव्य करावे) जमिनीवरील शुद्ध माती हाताच्या तळव्यांना लावून तळवे सूर्याला दाखवीत म्हणावे ' सूर्याय नम:! '.
सूर्याला नमस्कार करून हातातील मातीचा अंगठ्याने कर्त्याने आपल्या कपाळाला टिळा लावावा. तळव्याची माती सर्वांगाला लावावी. स्नान करावे किंवा डोक्यावरून पाणी शिंपडून मार्जन करावे.

आचमन करावे. स्मशानात नेत्राचमन केले जाते. (अपसव्य करून) वेदिकेवर तिलाक्षता देऊन वेदिकेचे आवाहन करावे. वेदिकेवर मध्यभागी मांडलेल्या दर्भावर अश्मा ठेवावा. अश्म्यावर दिवंगत व्यक्तीच्या नावे ' प्रेताचे ' आवाहन करावे. अग्नेयेकडील दर्भावर ' प्रेतसखीचे ' आवाहन तसेच उत्तरेकडील दर्भावर ' प्रेताधिपती रुद्र ', दक्षिणेकडील दर्भावर ' वैवस्वत यम ' आणि पश्चिमेकडील दर्भावर ' वायस ' अशाप्रकारे सर्व पाच देवतांचे आवाहन करावे. यानंतर वेदिके सहित या सर्व पाच देवतांची यथोपचारे पूजाअर्चा करावी. प्रत्येक देवतेला भूक आणि तहान भागवण्यासाठी पिंडासह दूध व तीळ मिश्रित पाणी भरलेल्या मातीच्या पात्राचे (उदककुंभ) पुढील प्रमाणे प्रत्येकी मंत्र म्हणून दान करावे.

१) " .. अमुक गोत्राय ..अमुक.. प्रेताय क्षुत्पिपासा निवृत्यर्थ अयं पिंड: सोदककुंभ उपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपस्थितिष्ठताम् ।।" असे म्हणून ' प्रेत ' देवतेसाठी अश्म्याच्या समोरील मधल्या पिंडावर आणि उदक कुंभावर पितृतिर्थावरून अंगठ्याने तिळाचे पाणी (तिलोदक) द्यावे.
२) प्रेतसखिभ्या क्षुत्पिपासा निवृत्यर्थ अयं पिंड: सोदककुंभ उपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपस्थितिष्ठताम् ।।" असे म्हणून आग्नेयेकडील ' प्रेतसखी ' साठी मांडलेल्या दर्भासमोरील पिंडावर आणि उदक कुंभावर पितृतिर्थावरून अंगठ्याने तिळाचे पाणी (तिलोदक) द्यावे.
३) ' प्रेताधिपती रुद्राय ' क्षुत्पिपासा निवृत्यर्थ अयं पिंड: सोदककुंभ उपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपस्थितिष्ठताम् ।।" असे म्हणून उत्तरेकडील ' प्रेताधिपती ' रुद्रासाठी मांडलेल्या दर्भासमोरील पिंडावर आणि उदककुंभावर पितृतिर्थावरून अंगठ्याने तिळाचे पाणी (तिलोदक) द्यावे
४) वैवस्वत यमाय क्षुत्पिपासा निवृत्यर्थ अयं पिंड: सोदककुंभ उपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपस्थितिष्ठताम् ।।" असे म्हणून दक्षिणेकडील ' वैवस्वत यमा ' साठी मांडलेल्या दर्भासमोरील पिंडावर आणि उदक कुंभावर पितृतिर्थावरून अंगठ्याने तिळाचे पाणी (तिलोदक) द्यावे
५) वायसाय क्षुत्पिपासा निवृत्यर्थ अयं पिंड: सोदककुंभ उपतिष्ठताम्। तस्योपरी तिलोदकं उपस्थितिष्ठताम् ।।" असे म्हणून पश्चिमेकडील ' वायसासाठी ' (कावळ्यासाठी) मांडलेल्या दर्भासमोरील पिंडावर आणि उदक कुंभावर पितृतिर्थावरून अंगठ्याने तिळाचे पाणी (तिलोदक) द्यावे

या पिंडांची व उदककुंभांची पूजा-अर्चा करावी. प्रत्येक पिंडाला एक एक पताका, पोलिका, छत्री आणि दोन दोन पादुका ठेवून या सर्व दानवस्तूंवर " पादुका द्वय, पोलिका छत्र पताकादी प्रत्येकं प्रत्येकं तेभ्यस्तेभ्या उपतिष्ठताम् । "असे म्हणत तिलोदक द्यावे.

(पान १० वर )

# सोनेरी दुनिया



**श्री. श्रीराम शेटये.**
**नालासोपारा.**

## राज कपूर - नर्गिस प्रेमकहाणी

भारतीय चित्रपट विश्वातील नायक नायीका यांच्या वैयक्तिक आयुष्यातील प्रेमकहाण्या देखील तितक्याच रंजक आहेत. यात आजही जाची चर्चा होते त्या राज कपूर आणि नर्गिस यांची प्रेमकहाणी एखाद्या चित्रपटा पेक्षाही रोमहर्षक आहे.

सन १९४६ सालातली गोष्ट आहे. राज कपूर आपला पहिला वहिला चित्रपट 'आग' बनवत होता. तो मुंबईत शुटींग साठी स्टुडिओ शोधत होता . त्यांला कोणीतरी सांगितले की मुंबईत फेमस स्टुडिओत जद्दनबाई आपला 'रोमीओ और जुलीएट' हा सिनेमा बनवित आहे. जद्दनबाई ही भारतीय चित्रपट अभिनेत्रि निर्माती, संगीतकार, फिल्म उद्योगातील पहिली महिला संगीतकार होती. एक तवायफ ते चित्रपट कलाकार ,निर्माती ,संगीतकार हा जद्दनबाई चा जीवन प्रवास आकाशाला गवसणी घालण्यासारखाच होता.

राजकपूर आपल्या 'आग' या चित्रपटासाठी स्टुडिओ मिळवण्यासाठी जद्दनबाई ला भेटायचा गेला होते. त्यांनी दरवाजा ठोकला तेव्हा जद्दनबाई घरी नव्हती. तीची मुलगी नर्गिस हीने दरवाजा उघडला. सोळा वर्षाच्या तरूणी नर्गिसला पहाताच पहिल्या भेटीतच राज कपूर तीच्या प्रेमात पडला.

'आग' चित्रपटाची कास्टींग जवळ जवळ पुर्ण होत आली होती परंतू नर्गिस साठी राज कपूर यांनी एक भुमिका त्यात परत समाविष्ट केली. या चित्रपटा दरम्यान दोघांमध्ये प्रेमसंबध निर्माण झाले. दोघेही एकमेकांच्या खुप जवळ आले. परंतू राज कपूर विवाहीत होता म्हणून दोघांच्याही घरातून या प्रेमाला विरोध झाला. पृथ्वीराज कपूर यांनी खुप प्रयत्न करूनही हे प्रेमसंबध काही थांबायचे नाव घेत नव्हते.

त्यानंतर आलेल्या राजकपूरच्या 'बरसात' या चित्रपटातही ही जोडी खुप गाजली. प्रेक्षकांना ही जोडी खुप आवडली. एकोणीससशे चाळीस ते पन्नास च्या दशकात ही जोडी खुप हिट झाली. अंदाज, बरसात, आह, आवारा, श्री ४२० यासारखे अनेक सुपरहीट चित्रपट या जोडीने दिले.
राज कपूरला बॉलीवूड च्या फिल्म इंडस्ट्री मध्ये पहिला शोमन मानले जाते. त्यांने आपल्या चित्रपट करिअर दरम्यान अनेक हिरोईन बरोबर ऑन स्क्रीन ऑफ स्क्रीन काम केले. अनेक हिरोईन्स ना चित्रपटात लॉन्च केले. चित्रपटाच्या कहाणी पासून लोकेशन आणि हिरो हिरोईन्स निवडण्याचा राज कपूर यांचा हातखंडा लाजवाब होता. परंतू नर्गिससोबत राजकपूर हे नाव खुप अविभाज्य झाले होते. नर्गिस बरोबरची राज कपूर यांची , ऑफ स्क्रीन ऑन स्क्रीन बॉण्डिंग जबरदस्त होती.

'बरसात ' चित्रपट बनवित असताना आर्थिक अडचणी आल्यावर नर्गिस ने आपल्या हातातल्या सोन्याच्या बांगड्या विकून आर. के. बॅनर ला मदत केली होती. बरसात मधील नर्गिस आणि राजकपूर यांचा एक युगल पोझ आर. के. बॅनर चा लोगो म्हणून वापरण्यात आला. पुढच्या काळात नर्गिस राज कपूरच्या आर. के. बॅनर ला आर्थिक अडचणीत मदत करीत राहिली. परंतू नर्गिसने राजकपूर सोबत विवाहाचा आग्रह धरला तेव्हा मात्र राज कपूरला ते शक्य झाले नाही. कारण विवाहीत असलेला राज कपूर आपल्या पत्नीला दुखावने त्याला शक्य नव्हते. परंतू राज कपूरच्या प्रेमात आकंठ बुडालेली नर्गिस मात्र राज कपूरच्या या निर्णयाने विषण्ण झाली. तीने आत्महत्या करण्याचे मन बनविला होते.

राज कपूर यांनी 'बॉबी' चित्रपट बनविला तेव्हा त्यात आपली नर्गिस बरोबर पहिली भेट कशी झाली तो प्रसंग त्यात दाखविला आहे. डिंपल आणि ऋषी कपूर यांची 'बॉबी' चित्रपटातील पहिली भेट हीच ती कहाणी आहे. अर्थात चित्रपटाचे कथानक वेगळे व काल्पनीक आहे. फक्त काही प्रसंग तेवढे राज -नर्गिस भेटीची आठवण करून देणारे आहेत.
बॉबी हा अल्लड वयातल्या युगुलांना घेऊन प्रदर्शित होणारा पहिला चित्रपट होता. हा चित्रपट ईतका चालला की 'मेरा नाम जोकर' हा चित्रपट आपटल्याने कर्जबाजारी झालेला राज कपूर पुन्हा सावरला. 'मेरा नाम जोकर ' हा राजकपूर च्या संपुर्ण जीवनगाथेवर आधारीत बनलेला चित्रपट होता.

'बॉबी' चित्रपट रिलीज झाला तेव्हा एक वर्तमानपत्रात आणि चित्रपट मासिकांमध्ये एक अफवा पसरली होती परंतू त्यात काही तथ्य नव्हते. डिंपल ही नर्गिस आणि राजकपूर यांची नाजायज मुलगी आहे. अर्थात डिंपलचे वडील एक गुजराती उद्योजक होते. परंतू पत्रकारांनी टी. आर. पी. साठी अशी अफवा पसरवली होती.



२ दिवसा पूर्वी लोकसभेची रणधुमाळी संपली. आपण सगळ्यांनी आपल्या परीने काम केलात पण आपल्याला अपेक्षित यश मिळवता आलं नाही याची खंत कायम मनात आहे. त्या मागच्या कारणाचा आपल्याला नक्की विचार करावा लागेल.
१)आपला कार्यकर्ता नाराज का होता?
२)गाव पातळीवर प्रचार झाला की नाही?
३) आर्थिक टंचाई मुळे की आपले कार्यकर्ते मतदारण पर्यंत पोहचलेच नाही?
४)नेत्यांवरची नाराजी?
अशी एक ना अनेक कारणे असतील. यात कोणाला दोष देण्याचा हेतू नाही. परंतु भाजप किंवा समर्थक कार्यकर्ते इर्शेने काम करत होते त्या तुलनेत पण कमी सगळेच कमी पडलो हे मान्य कराव लागेल. याल कारणे बरीच आहेत.

परंतु आपण आपला नुकसान करुन घेतलाय. आपल्याला एक वाली होता तो आपण गमावलाय हे नक्की. या पुढे आपण कोणाकडे हक्काने जाणार हा प्रश्न आहे.

आणि म्हणूनच माझी एक विनंती आहे. आपण या पुढच्या निवडणुका जर लढवणार असू तर आपल्या
कणकवली विधानसभेचा उमेदवार येत्या १५ दिवसात जाहीर करा
हात जोडून मनापासून विनंती आहे.
आणि पुन्हा पदाधिकारी निवड करा. अगदी माझ्या जागी पण कोणी दुसरा चांगला काम करणारा योग्य व्यक्ती नेमलात तरी चालेल . परंतु काळाची गरज आहे आपण जर हा निर्णय नाही घेतलात तर या पुढे कोणतीच निवडणूक आपण जिंकू शकत नाही.

जर वरिष्ठांनी याचा विच्यार केलात नाही तर मात्र पुढे अजून मोठा खड्डा तयार आहे. आमचे राजीनामे घ्या आणि आम्हाला मोकळा करा. माझ्या सारख्या कार्यकर्त्याला हे सहन होत नाही.
लोकसभेचा वचपा आम्हाला काढायला संधी आहे. पण नेत्यांची मानसिकता जिंकण्याची आहे. अस मला वाटत नाही.

उमेदवारी जाहीर करा. थांबणारे थांबतील जाणारे पक्ष सोडून आता जातील. उद्या जे होणार ते आत्ता होईल.

खूप काही बोललो तर माफ करा लहान समजून
पण मला हे सगळं बघवत नाही. म्हणून बोलून टाकल. मनात खूप खदखद आहे. तरी थांबतो.

**जय महाराष्ट्र**
**आपला**
**गणेश गांवकर**

## कोकण... एक रम्य स्वर्ग!

कोकणातील निसर्गसौंदर्य सर्वांनाच खुणावत असते. एकदा तरी कोकण पाहून घ्या, तुम्ही नक्कीच कोकणच्या प्रेमात पडाल असे म्हटले जाते. आणि ते खरेही आहे. शहरातील कोकणवासीय तर कोकणात जाण्याचे निमित्तच शोधत असतो. शहरातील धकाधकीच्या जीवनाला कंटाळलेला चाकरमानी वेळात वेळ काढून सणासुदीच्या निमित्ताने हमखास कोकणात दाखल होतो आणि शहरी जीवनात मरगळलेलं मन ताजेतवाने करतो. कारण त्याला पक्कं माहिती असते की कोकणात आल्यानंतर स्वर्गातील सुख काय असू शकेल त्याची प्रचिती नक्की मिळते.

काय नाही आहे कोकणात? नदी, नाले, विहिरी, पाट, स्वच्छ समुद्रकिनारा, डोंगर, विविध झाडे, आमराई, देवराई, वळणावळणाचे रस्ते, लाल माती, पायवाटा आणि इतरही बरेच काही. उन्हाळा सोडला तर इतर हंगामात कोकण सर्वच अंगाने हिरवेगार होते. हिरवा शालू नेसलेलं कोकण मनाला भुरळ पाडते. अशा कोकणापुढे तो स्वर्गही फिका पडत असणार.

कोकणातील जैवविविधताही अभ्यासकांसाठी पर्वणीच आहे. नवनव्या प्रजातींचा शोध लावण्यासाठी निसर्गप्रेमी कोकणाकडेच धाव घेतात. वेळास येथे होणारा कासवमहोत्सवही खासच. पावसाळी वातावरणाअगोदर होणारे काजव्यांचे मनोहारी दर्शन कोकणात पाहिल्यानंतर वेगळ्या आणि कृत्रिम रोषणाईचे आकर्षण राहत नाही. रात्री होणारे आकाशदर्शन विलोभनीय असते. शहरात दुर्बिणीतून न्याहाळले जाणारे आकाश कोकणात साध्या डोळ्याने पाहता येते. वेगवेगळे तारकासमूह आपण सहज पाहू शकतो. तारांगणाचा नयनरम्य खेळ पाहताना डोळे दिपून जातात.

कोकणचा कॅलिफोर्निया करणार असे राजकारणी सतत म्हणत असतात. पण त्याची गरज नाही. कारण कोकण मुळातच त्या कॅलिफोर्नियापेक्षा सुंदर आहे. फक्त त्याचे स्वर्गीय सौंदर्य आपणाला जपता यायला हवे. वृक्षतोड, जंगलतोड आणि मानवी अतिक्रमण यापासून कोकणाला वाचवायला हवे. नाहीतर कोकणासारख्या रम्य प्रदेशाला पुढील पिढ्या मुकतील !!

**दीपक गुंडये, मुंबई**

# सरकारी योजना/नोकरी

## आंतरजातीय विवाह अनुदान योजना

**आंतरजातीय विवाह अनुदान योजनेअंतर्गत अर्ज करताना अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी लागतात.**

- **योजनेचा अर्ज: योजनेचा अर्ज आम्ही खाली दिलेला आहे तो डाउनलोड करा किंवा कार्यालयात जाऊन अर्ज मिळवू शकता.**
- **आधार कार्ड: अर्जदार वधू आणि वराचे आधार कार्ड**
- **रहिवाशी दाखला: रेशन कार्ड, वीज बिल**
- **विवाह प्रमाणपत्र: विवाह केल्याचे प्रमाणपत्र**
- **जात प्रमाणपत्र: वधू आणि वराचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र**
- **उत्पन्नाचा दाखला: सक्षम प्राधिकाऱ्यानी दिलेला उत्पनाचा दाखला**
- **बँक खात्याची माहिती: बँक पासबुक झेरॉक्स**
- **फोटो: लग्नाचा एक फोटो, लग्न पत्रिकेचा फोटो, पासपोर्ट आकाराचा फोटो, जामीनदारांचे फोटो**
- **विवाहानंतर तीन वर्षांपर्यंत एकत्र राहण्याचा शपथपत्र**
- **वर आणि वधू यांच्या वार्षिक उत्पन्नाचा पुरावा (जर नोकरी करत असतील तर वेतनपत्रक, आणि जर व्यवसाय करत असतील तर ITR)**

**कागदपत्रे जमा करण्याची प्रक्रिया:**

- **विहित नमुना अर्ज भरून सोबत आवश्यक कागदपत्रे जोडा.**
- **भरलेला अर्ज आपल्या जिल्ह्यातील समाज कल्याण कार्यालयात जमा करा.**
- **अर्ज जमा केल्यानंतर अधिकाऱ्यांकडून त्याची तपासणी केली जाईल आणि जर कागदपत्रे पूर्ण आणि योग्य असतील तर तुम्हला पात्र समजून अनुदान मंजूर केले जाईल.**
- **अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाईल.**


**महत्त्वाचे मुद्दे:**

- **अर्ज विवाहाच्या तीन वर्षांच्या आत सादर करणे आवश्यक आहे.**
- **वर आणि वधू हे महाराष्ट्राचे रहिवासी असणे आवश्यक आहे.**
- **विवाह नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.**
- **वर आणि वधू यांच्यातील वय फरक किमान 21 वर्षे असणे आवश्यक आहे.**
- **अर्जदार किंवा त्याचा/तिची पत्नी/पती यांनी शासनाच्या कोणत्याही इतर योजनेतून आर्थिक लाभ घेतला नसावा.**
- **योजनेमध्ये बदल होऊ शकतो त्यामुळे आवश्यक कागदपत्रांमध्ये बदल होऊ शकतात.**

**कार्यालय पत्ता**

**संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी,**
**जिल्हा परिषद / मुंबई शहर व उपनगरासाठी**
**समाज कल्याण अधिकारी.**

**संपर्क क्रमांक**
**1800-233-7337**




## रोजगार हमी योजना महाराष्ट्र अंतर्गत विविध कामे

राज्यातील ग्रामीण भागातील अकुशल कामगारांना रोजगार उपलब्ध नसतात त्यामुळे त्यांना उदरनिर्वाहासाठी खूप साऱ्या समस्यांचा सामना करावा लागतो तसेच पावसात रोजगाराची कामे देखील उपलब्ध नसतात त्यामुळे अशा कामगारांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी रोजगार हमी योजना महाराष्ट्र अंतर्गत विविध कामे हाती घेण्यात येतात.

रोजगार हमी योजना महाराष्ट्र यादी खालीलप्रमाणे

- समुदायासाठी मत्स्यपालनाचे तलाव बांधणे
- समुदायासाठी मत्स्य पालन तलावाची दुरूस्ती
- समुदायासाठी मत्स्यपालनाचे तलाव नूतनीकरण
- समुदायासाठी समोच्च खंदक खंदकाचे
- समुदायासाठी वितरक कालवा बांधणे
- समुदायासाठी किरकोळ कालवा बांधणे
- समुदायासाठी उप किरकोळ कालवा बांधणे
- समुदायासाठी जल कोर्स बांधणे
- समुदायासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या कालव्याच्या अस्तरीकरण
- समुदायासाठी वितरण करणाऱ्या कालव्याच्या अस्तरीकरण
- समुदायासाठी छोट्या कालव्याच्या अस्तरीकरण
- समुदायासाठी उप-गौण कालव्याच्या अस्तरीकरण
- समुदायासाठी जल कोर्स चे अस्तरीकरण कालवा कालवाची अस्टर
- समुदायासाठी पाणी पुरवठा नूतनीकरण
- समुदायासाठी वितरण करणाऱ्या कालव्याचे नूतनीकरण
- समुदायासाठी किरकोळ कालव्यातील नूतनीकरण
- समुदायासाठी उप- किरकोळ कालव्यातील नूतनीकरण
- समुदायासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या कालव्याचे नुतणीकरण
- समुदायासाठी वितरण करणाऱ्या कालव्याचे नूतनीकरण
- समुदायासाठी किरकोळ कालव्यातील नूतनीकरण
- समुदायासाठी उप-किरकोळ कालव्यातील नूतनीकरण
- समुदायासाठी पाण्याचे कोर्स कालवा नूतनीकरण
- समुदायासाठी बांधण्यात आलेल्या तळ्याचे मजबूतीकरण
- समुदायासाठी बांधण्यात आलेल्या तळ्याचे नूतनीकरण
- समुदायासाठी भूमिगत बंधाऱ्याचे बांधकाम करणे
- समुदायासाठी पुरसंरक्षण भिंत बांधणे
- वैयक्तिक सिंचन विहिरीचे कामे
- समुदायासाठी सिंचन विहिर
- समुदायाच्या सिंचन विहिरीसाठी कठडा बांधणे व दुरूस्ती करणे
- सार्वजनिक विहिरीचे बांधकाम
- वैयक्तिक लहान पाझर तलाव बांधणे
- समुदायासाठी लहान पाझर तलाव बांधणे
- समुदायासाठी लहान पाझर तलाव देखभाल / दुरूस्ती
- समुदायासाठी पूर वळण बंधारा
- समुदायासाठी पूर नियंत्रणासाठी बांधण्यात आलेल्या नाल्याचे नूतनीकरण
- समुदायासाठी पूर नियंत्रणासाठी बांधण्यात आलेल्या नाल्याचे दुरूस्ती
- समुदायासाठी सिल्विपॅचर ग्रासस्लँड्सचा विकास
- वैयक्तिक लाभार्थ्यासाठी सिल्विपॅचर ग्रासस्लँड्सचा विकास करणे
- वैयक्तिक लाभासाठी गटारे बांधणे
- समुदायासाठी चौर जमिनीच्या विकासाठी
- समुदायासाठी पडीक जमिन जमिनिचा विकास
- समुदायासाठी पाणथळ जमिनीचे पुर्न: विकास करणे
- समुदायासाठी पाणथळ जमिनीमध्ये गटार खोदणे
- वैयक्तिक बार्कले कॉम्पोस्ट खड्डा बांधणे
- समुदायासाठी बर्कले कॉम्पोस्ट खड्डे बांधणे
- समुदायासाठी बर्कले कॉम्पोस्ट खड्डाची दूरुस्ती करणे
- समुहासाठी बार्कले कॉम्पोस्टखड्डे बांधणे
- समुदायासाठी धान्य साठवण इमारत बांधणे
- समुदायासाठी धान्य साठवण इमारतीची दुरूस्ती
- समुहासाठी कृषी उत्पादनाचे साठवण इमारत बांधकाम

**उर्वरित भाग पुढील रविवारी**

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ॲंड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क:rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क:sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862



## चुलतो हुनता हुनान...

रीना पास्ते परब
सावंतवाडी

बाबलो आवशीक घेवन वाडीक उतारलो. स्टॅणार उतारलो तोच रिक्षेक बगूक लागलो.
"अरे आठाची गाडी लागतली मरे आता. वायच वगत उबो रवलस तर तुजेच पैशे वाचतले..." आवस बाबल्याच्या पाठसून चलता चलता बॉला होती... " गे आई रिक्षेन जावया. ताटकळत कित्या उब्या रवाचा असता तुका..." बाबलो रिक्षेक हात दाखयत बोललो. हात दाखयल्यार रिक्षा घेवन तातो बाबल्या डेगेक यवन उबो रवलो. धुरयाच्या ट्यामार जावचा हा हुनत बाबलो सरळ भुतुर रिगलो.
"अरे कितके घेतलो ता तरी इचार..." आवशीन हुतलेन.
"साडे तिनशी जातले गे तुमच्या ट्यामार जावक..." रिक्षा चलयता चलयता तातो बोललो.
"नयिन नाय आसव आमी, दोनशी घेतत ते म्हायती हत माका... साडे तीनशी कदी रे केलास...?" बाबल्याची आवस आवाज चढवन बोलाक लागली.
"गे आई... शम्बर दिडशीचा त्वांड काय बगतस... घेवने तडे..." तात्याचा त्वांड उगडाच्या आदी बाबलो बोललो हुनान जाला. नाय तर रिक्षेवाले आयकान घेनत नाय कोनचा. ढोकाच्या फुडे यवन तात्यान रिक्षा लायली. बाबल्याचा घर दाये हातीक होता.
"खालते घे मरे वायच..." बाबल्याची आवस बोलली.
"नाय गे तडे अडचणीत... परताक गावाचा नाय... हयच उतरा तुमी..." तातो मोबायलात बगीत बोललो. बाबल्यान पैशे दिले तसो तातो फरफरावन पाटी परातलो.
"हयते रिक्षेवाले पैशे काढूचे धंदे करतत. चाकरमान्या गमली काय दाम दुपटीन लायतत..." बाबल्याची आवस बोलली त्याच्यार बाबल्यान तिका गप केल्यान.
"तो बग गे काका इलो..." बाबल्यानं चुलत्याक बगीत आवशीक सांगल्यान. चुलतो फुडे इलो नि होनशीच्या हातीतली आदी बॅग घेतल्यान. तब्येतीची चवकशी करीत बोलत बोलत सगळी घराकडे इली. जावो जावो खळ्यातच भेटली. डोळ्यातली दुका पदरान पुसत बाबल्याची आवस लोट्यार बसली.
"न्हाताय काय चाय दिव तुमका...?" चूलतेन ईचारला.
"आदी न्हातव... आंग मास मोडान इला माजा... आईचे तर पाय सुजले..." बाबल्यान बॅग वळयत हाडीत उघडली. आपले कपडे हातीत घेवन तो झरीर जावक लागलो.
"मिया झरीर जावन थण पानयान न्हातय..." हुनत तो वाटेक लागलो. चूलतेन जायेक पानी उसपान दिला. बाबल्याची आवस मोरयेत जावन न्हाली. पानयाचो भाजललो वास तिका तरतरी देवन गेलो. भायर यवन पात घातलली चाय खावन ती बॅगेतला खावक काढुक लागली. बाबल्यान न्हावन, कपडे धुवन हाडून खळ्यात घातल्यान.
"काकी भूक लागली गे, खायतरी खावक दि..." बाबलो आजाच्या आरश्यात बगीत कॅस उगयत बोललो.
"श्याक करून ठेयलय रे... तुका आवाडता हुनान..." चूलतेन चुलीकडे जाता जाता हुतलेन. तिना श्याक केळीच्या खोल्यार घालून भायर व्हरान सगळ्यांका दिलेन. बाबल्याक आज खूप दिसांनी हसान बोलान खाताना बगून, आवशीक बरा वाटला. तितक्यात चुलत्यान बाबल्याक बागात जावया हुनान सांगला. बाबलो मोबायल खिशात घालून श्यान्डल घालूक वनावलो, तितक्यात "रे बाबल्या हयते श्यान्डल बागातसून यताना हातीत घेवचे लागतले, ता स्लीपर घाल माजा..." चुलत्यान बाबल्याक सांगला. बाबलो स्लीपर घालून चुलत्याच्या पाटी चलाक लागलो. बागात जावन शिंगापूरी माडाचा आडसाल काडून थयच पाळान फोडून ता बाबल्याक खावक दिला. माडाच्या अळ्यार बसान बाबल्यान आडसाल खाला.
"तडे साठ रुपये देवन नारळपाणी पिवन इतक्या भारी कदीच वाटणा नाय रे काका..." बाबलो चुलत्याक सांगा होतो. "बाबल्या सांजे सुम्या आतेच्या घराक जावया... तुका काय तरी दाखवचा आसा..." चुलत्यान हळू हळू बोलाक सुरवात केली.
"तडे काय आसा रे आतासा...?" बाबल्यान ईचारल्यान.
"सुम्या आतेच्या जायेचा चडू तुका दाखवचा आसा..." चुलत्यान सरळ विषय काय तो सांगलो. बाबलो ताडकन उठान उबो रवलो.
"बाबल्या तुका माजी शपत आसा... तिया आजतग्यात माज्या शब्दाभायर जावक नाय हुनान मिया तुका हडे बोलवन घेतलंय... यवनू तुजा लगीन करूचा आसा माका... तुज्या वांगडा जा जाला ता इसार आता... आज जा पोरग्या बगतलय ता मनापासून बग, मगे माका उत्तर दि..." चुलतो बाबल्याच्या खानार हात ठेवन खूप येळ बॉला होतो.
"मिया हयात आसासर तरी तुजा लगीन जाव व्हया..." ह्या आयकान बाबल्याचे डोळे डबडबले... त्याना होयकारात मान हलयली. चुलतो खुश जालो. आता सांजे जावची तयारी करू व्हयी हुनत तो बाबल्याक मिठी मारूक लागलो. बाबलो चुलत्याक बगीत रवलो... सांजे काय जातला ह्या ईचारात....




## मीरगाची धांदल



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.


मीरगासाठी कित्ती तयारी करा, पण मीरगाचो पयलो पाव्स जेव्हा येता ना, तेव्हा धावपळच उडता. तरी यंदा काय ना केलंय, वाडो कुडलय, लाकडा भरलंय, शेणी भरलंय, गवात भरला, वसरी प्लॅस्टिक टाकून ढाकलव तरीपण काल मीरगाच्या पावसान ह्यो हुदुदो केल्यान. तरी ह्यांच्या पाठी लागान कौला परतून घेतललय. आता कौला परतुक तरी कोण बापये गावतत? ह्योनी जोडलले मित्र आसत म्हणान साद घातल्यार येतत. माका ह्यो बोलले कौला परतून घेवया. पण कोंबो काप. वडे कर. कामदारांक खूश करुया.

मटाण नि वडे खाव्न कामदार खूश झाले. तरी काल मीरगाच्या पावसान कौला गळाची ती गळलीच. मिरगाचो पाव्सच बाय असो लय धुमाकूळ घालीत येता. घडघडता काय, चमचमता काय नि झाडापेडांक पिळवटीत वारो येता. पतेरो नुसतो उडत जाता. झाडा पेडा मोडान पडतत. परतलली कौला पण वाऱ्याच्या धुमशानात उलटी सुलटी होतत. बरा कोंबडी, कुत्री तरी हाताक गावतत काय? वाऱ्याबरोबर सैरभैर धावतत. काल तर वाड्यातला रेडूक कसला उंडारला! मानेक बांधलली कनी तोडून परड्यात पळाला. शेपटी वर करीत जकडे तकडे उंडराक लागला. पयल्या पावसाचो ना, भयच वाटता. पावसाचो कित्याक, पावसाचा काय वाटत नाय. पण ता घडगडता ना, त्येचो भय वाटता. थाड्थाड् करीत असे बार उडतत ना, कानठळे श्याप बसान जातत.

एकदा बाय अशीच मीरगाच्या पावसात आमच्या घरासमोरच वीज पडली ना! आम्ही बाय 'राम राम' म्हणत लोट्यार बसललव. वीज नुसते आमच्या डोळ्यासमोर चमका व्हती. वळवळत जाय व्हती आणि बाय एकदम जो ठो ठो करून जा कडकडला, वीजेचो लोळ असो डोळ्यांसमोरून सरकन पुढे गेलो ना, आमचे डोळे पांढरे झाले. आंगात सरकन् शहारे इले. दोन तीन सेकंदाचो खेळ. पण तेवढ्या क्षणात सगळी लुळी पडल्यासारखी झाली. बेबी तर फीट येवन पडला. खयतरी जवळच वीज पडली व्हती.

आम्ही देवाक हात जोडले. नशीब, वीज आमच्या घरात नाय घुसली. तरी आमचे हे वीज घरात येव नये म्हणान पडयेच्या सरयेत पारय खुपसून ठेवतत. पारय ठेवली काय वीज घरात येणा नाय असा म्हणतत. वीज पडान गेली नि जोराचो पाव्स वताक लागलो. तेव्हापासून माझे बाय ह्या पयल्या नि अखेरच्या पावसाचो भय वाटता.

कालच्या मीरगाच्या पावसान अशी धानाधिसपट केल्यान काल पण खयतरी वीज पडली असतली. कारण घडघडाच तसा व्हता. पयलो पाव्स असो धडाम धुडूम करीत येता. पण पयलो पाव्स पडता ना तेव्हा लय जणांचे कळये खुलतत. लय जाण अशा वक्ताक मोर होतत. पोराटोरा पावसात नाचतत. गुराढोरा उंडारतत. पयल्या पावसान ना, खरा म्हणशात तर झाडापेडा लय खूश होतत. काल रस्त्यान येतना बघलय तर बारके बारके पोरगे पावसात नाचा व्हते. आमच्याकडे बघून म्हणत व्हते, फ्रेन्ड्स हॅलो, चाय पकोडा खा लो!





# चिकन रोल्स



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

चिकन रोल्स हे एक स्वादिष्ट आणि लोकप्रिय स्नॅक आहे. खालील रेसीपीतून तुम्ही घरी चिकन रोल्स कसे तयार करायचे ते शिकू शकता.

साहित्य:

चिकन फिलिंगसाठी:

- २५० ग्राम चिकन ब्रेस्ट, छोटे तुकडे करून
- १ मध्यम कांदा, बारीक चिरलेला
- १ मध्यम टोमॅटो, बारीक चिरलेला
- १/२ कप शिमला मिर्च, बारीक चिरलेली
- १ टेबलस्पून अद्रक-लसूण पेस्ट
- २ टेबलस्पून तेल
- १ टीस्पून हळद
- १ टीस्पून लाल तिखट
- १ टीस्पून गरम मसाला
- चवीनुसार मीठ
- १ टीस्पून लिंबू रस
- २ टेबलस्पून कोथिंबीर, बारीक चिरलेली

चिकन फिलिंगसाठी:

1. एका पॅनमध्ये तेल गरम करा. त्यात कांदा घालून सोनेरी रंग येईपर्यंत परता.
2. त्यात अद्रक-लसूण पेस्ट घालून चांगले परता.
3. आता चिकनचे तुकडे घालून उच्च आचेवर परता, जोपर्यंत ते अर्धवट शिजत नाहीत.
4. त्यात टोमॅटो, शिमला मिर्च घालून चांगले मिक्स करा.
5. हळद, लाल तिखट, गरम मसाला, आणि मीठ घालून चांगले मिक्स करा.
6. चिकन पूर्णपणे शिजेपर्यंत आणि मिश्रण कोरडे होईपर्यंत शिजवा.
7. शेवटी लिंबू रस आणि कोथिंबीर घालून मिक्स करा. फिलिंग तयार आहे.

रोलसाठी:

- मैदा आणि पाणी मिक्स करून एक पातळ पेस्ट तयार करा.
- चपात्या किंवा पराठे तयार करून घ्या. (चपाती/पराठे तयार नसतील तर नवीन बनवून घ्या.)
- प्रत्येक चपाती/पराठ्यावर चिकन फिलिंग ठेवा आणि रोल करा.

सर्व्हिंग:

- गरमागरम चिकन रोल्स सॉस किंवा चटणी सोबत सर्व्ह करा.
- या पद्धतीने तुम्ही स्वादिष्ट चिकन रोल्स तयार करू शकता. मजा करा!




## समाजभान



श्री.धनंजय शेटये
गोळवण, सिंधुदुर्ग

# मीठ आणि जीवन

आपल्या आहारात नेहमीच परिचयाचे आणि अत्यावश्यक म्हणजे 'मीठ' होय. मीठाशिवाय जेवण हे बेचव होऊन जाईल. पण मीठाचे ठराविक प्रमाण असावे लागते. ते कमी अथवा जास्त झाले तर परत चव बिघडते.
' खाल्ल्या मीठाला जागणे' हा वाक्प्रचार मराठी भाषेत रुढ आहे.एखाद्याचे केलेल्या उपकाराची संकटसमयी परतफेड केली की लोक म्हणतात, 'खाल्ल्या मीठाला जागला'. तसेच 'मीठाचा खडा पडणे' म्हणजे चांगले सहसंबंध असताना एखाद्या क्षुल्लक कारणावरून वाद झाल्यानंतर लोक म्हणतात, ' दुधात मीठाचा खडा पडला'.बॉलीवुडमधील सुप्रसिद्ध माईलस्टोन ठरलेल्या ' शोले' चित्रपटांमध्ये कालिया गब्बर सिंगला सांगतो,
'सरदार गलती माफ करो मैने आपका नमक खाया हैं'

एखादा माणूस एखाद्याच्या घरचं अन्न खातो त्या खाल्ल्या अन्नाला जागणे, उपकाराबद्दल कृतज्ञ राहणे यासाठी 'तुमच्या घरचं मीठ खाल्लं आहे, कसा विसरेन?' असे बोलतो. एकंदरीत काय तर जेवणात मीठ असायचं.पूर्वीच्या काळात तिन्हीसांजेला म्हणजे संध्याकाळी मावळतीच्या वेळेला कोणाजवळ मीठ उसणं मागायला जायचं नसतं असा रिवाज होता. तसेच संध्याकाळी बाकी सर्व वस्तू उसण्या दिल्या घेतल्या जायच्या पण मीठ मात्र कधी दिलं जातं नसायचं. काल आजपर्यंत दुकानदारही आपल्या दुकानातलं मीठ संध्याकाळच्या वेळी देत नसतं. पण नंतर नंतर स्वतःच्या हाताने देत नसतं तर दुकानातील वस्तू विकाताना अंधश्रद्धेमुळे नाकारता येत नसल्याने ग्राहकांना मीठाची पिशवी स्वतः उचलून घ्यायला सांगत असत. श्रद्धा आणि अंधश्रद्धा या विषयात मला अडकून पडायचे नाही पण मीठ आणि परंपरागत रीती रिवाजा समजले पाहिजेत.

लहान बाळाची दृष्ट काढताना तसेच नवी नवरी घरात पाऊल टाकताना मीठ मोहरींने दृष्ट काढली जायची.मग दृष्ट काढलेली मोहरी आणि मीठ चूलीत टाकले जायचे म्हणजे कुणाची भुताखेताची,माणसाची नजर लागली असेल तर ती जळून जावी. आहारात तर मीठ अगदी अग्रस्थानी आहे, किंचित प्रमाणात उपस्थिती असली तर जेवणाला लज्जत वाढते आणि जेवणात जर मीठ नसेल आणखी सर्व वस्तू जरी असल्या तरी त्या जेवणाला बेचव म्हणून नाव ठेवले जाईल किंबहुना बेचव अळणी जेवण कोण कसे जेवेल?? ही आहे मीठाची खरी ताकत.!!
काही पदार्थ दीर्घकाळ टिकण्यासाठी मीठात घालून ठेवले जातात.त्यामुळे त्या पदार्थाचे आयुष्य वाढते. मृत्यू नंतरही प्रेताचं दहन करताना मीठाचा वापर केला जातो. त्यामुळे
**'जिंदगी के साथ भी जिंदगी के बाद भी!'**

पौराणिक कथांमध्ये मीठाचं वेगळंच स्थान आहे.खरंतर मीठ हे समुद्राच्या खा-या पाण्यापासून बनविले जाते. मीठागर ,मीठाची शेती केली जाते.पण पौराणिक काळात असे म्हटले जाते की सर्व समुद्रांचे पाणी पहिल्यांदा गोड होते पण अगस्ती ऋषींनी कोपाने रागाच्या भरात सर्व समुद्र एका आचमनात प्राशन करून टाकले होते.नंतर एवढं पाणी उत्सर्जित केले तेव्हा त्या पाण्याला खारटपणा प्राप्त झाला असा अंधश्रद्धाळू समज आहे.

आमच्या लहानपणी आमच्या घरी पावसाळ्यापूर्वी मीठाची बेगमी केली जायची. आमच्या घरचे खडा मीठाच्या दोन फ-या ( पोती) घ्यायचे. घरोघरी खडा मीठ फरी पावसाळ्यासाठी ठेवणीचे मीठ म्हणून खरेदी केलं जायचं.मीठाची एक फरी चूलीच्या पाटणाशेजारी ठेवली जायची. ती जागा ती भींत पावसाळ्यात आरपार ओलसरपणाने तवायची.दुसरी मीठाची फरी गाईगुरांना रोज पाणी देताना मीठ टाकून दिले जायचे म्हणून ती वाड्यात ठेवली जायची. उपयोगी ठरणारे मीठ म्हणजे आपल्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचे आहे.

# वाचकांच्या प्रतिक्रिया

**(पान ३ वरून)**

**डॉ. स्मिता दातार, मुंबई** - अस नाहीये.. फिल्टर्स असतात. पण लग्नाळू मुलगे insecure असतात. स्त्री मुक्तीच्या लाटेमुळे मुलींना खूप महत्त्व मिळालंय. चूक नाहीये ते.. अनेक पिढ्या दबलेला आवाज आणि उद्रेक आहे तो. पण लग्नातलं स्त्री पुरुष समान महत्व काही ठिकाणी विसरल जातंय आणि मुलींची अहंमन्यता वाढतेय. हे चित्र शिक्षण, सांपत्तिक स्थिती , upbringing , धर्म , भौगोलिक परिस्थिती याप्रमाणे ठिकठिकाणी वेगळं आहे. या समस्येला एकच मापदंड लावता येत नाही.

**डॉ. विनिता केळकर. ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या फेसकॉमच्या अध्यक्षा,पुणे** - हा विषय लग्न न करता एकट्या राहणाऱ्यांचा आहे. छानच मांडला आहे. शिवाय आयुष्यात पुढे, एकटेपण येते त्याबद्दलही लिहा.

**शशांक अंबुरले - मुंबई**, लग्न हा मंगल नसून सापळा झाला झाला आहे. पुरुषांच्या जान, मान आणि चारित्र्य राखणारा कायदा झाला. तरच लग्न करण सेफ आहे. माझ्या डोळ्यासमोर अनेक उदाहरणे आहेत ज्यांनी लग्न केलं आणि महिना भारत दिर्हॉस नोटीस आणि आणि मग तोंडात येईल ती रक्कम अग व १० लाख-पासून ते करोडोंपेर्यंत काही ही !

**सुहासिनी भातवडेकर , पुणे** - उत्सुकता आहे ,पुढे विषयावर विविध मते,बाजू वाचण्याची

## आठवणींच्या गोष्टी

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

### म्हातारीचा बळी गेला

भगतीन बायोचा अख्या पंचक्रोशीत नव्हे तर तालुक्यात दरारा होता. स्वतःच्या पडक्या झोपडीत राहतं होती. पणं इतरांना चांगली घर, त्यांचे बंगले होण्याची ते मिळवून देण्याची ती आश्वासन देतं असायची. हिच्या पोटीपाटी कुणीच नव्हतं पणं आपला वंशवेल वाढण्यासाठी लोकं हिला शोधत ऊनवारा, थंडी पावसातून, डोंगरदऱ्यातून, चिखलमाती तुडवत, भरलेले नदीनाले ओलांडून मैलोनमैल चालत येतं असतं. म्हातारीचा नवरा दुसऱ्याच्या पायकीला होता. ही पणं त्याच्या सोबत मोलमजुरी करायची. बायोला शेतीवाडी, जमीन जागा नव्हती . कुणीतरी जवळच्या नातेवाईकांनी हिला घरपरड्यापूर्ती राहायला जागा दिली होती. हीच लग्न झाला होत . जवळच्या गावाचा नात्यातला आतेभावा सोबत लग्न लावून दिलं होत. लग्नानंतर ही सासरी काही राहिली नाही. मी माझ्या बापाकड माहेरात राहीन, तिथं मोलमजुरी करुन जगेन म्हणाली. नवऱ्याला म्हटली इथ तरी तुझ काय हाय? पाच भावात तुझ्या वाटणीला काय येणारं हाय? चल माझ्या माहेरात, ते काय तुला परक हाय, तुज आजोळच हाय ना. आली मजुरी करू.माझ्या बापाला मुलगा नाही. तो पणं गावात तिथं पाव्हणा म्हणून जगलाच ना? कुणी अडवल का त्याला. आपणं गेलो तर त्यांनाही आधार होईल. हिचा नवरा गरीब पणं स्वाभिमानी होता. मामा असला नी आता सासरा झालाय पणं त्याच्या घरात मी नाय राहणार. कुठंतरी मलाही जीवन जगायचं आहे. इथ तरी काय हाय, तिकड मोलमजुरी मिळेल जगू आपणं कसतरी, आली कधी आईची ,भावंडांची आठवण तर येईन मी इकड.माझी आय पणं येइल आपल्याकडे राहायला. एवढयाशा घरात पाच भाऊ कस राहणार? जागा जमीन तरी कुठं हाय एवढी. तुझ्या आग्रहामुळे आणि विचार पटल्यामुळे येतो तुझ्या माहेरात .आणि तो गडी बायको सोबत घरजावई म्हणून नव्हे तर पोटापाण्याची सोय म्हणून आला नी संसार थाटला त्यानं सासरवाडीत.

बायो माहेरात आल्यावर काहीं दिवस बापाच्या घरात राहिली. भाचाच जावई म्हटल्यावर आणि आपल्याला कोण तरी आधार हवा या उद्देशाने त्यांनी मुक संमती दिली. रहा इथ ,जगा काबाडकष्ट करून सासरा म्हणाला. मी तुमच्या घरात, सोबत न राहता वेगळी चुल करून खाईनच पणं मला स्वतंत्र घर बांधायचं आहे बायोचा नवरा म्हणाला. आहे ते तुमचंचं घर आहे वेगळं कशाला बांधता. पणं बायोनही नवऱ्याच्या मताला दुजोरा दिला. वाडीतील एका जवळच्या नातेवाईक यांना मला घरापूर्ती जागा द्या म्हणाली. नवी नवरी, पुन्हा नात्याचा प्रश्न? बांध तू खोपट नी रहा सुखान नातेवाईक म्हणाला. दगडगोठे जमवून कुणी एक एक वासा, गवताची वरंड दिली. काहींनी माप घालायला, घर बांधायला श्रमदान केलं. बापाच्या जवळचं स्वतःच्या खोपटीत स्वतःचा संसार सूरू केला.

बायोच्या आईच्या अंगात कसलं तरी पाणी होत. ती अमावस्या पौर्णिमेला घुमायची, चार लोक जमायची मग कुणीतरी भाबडेपणाने तिच्याशी आपल दुःख अडचण बोलायचं, ही मग चुलीतल्या निखाऱ्याची राख ,अंगारा म्हणून द्यायची, कधी या दिशेला तोंड करुन, कधी सीमेवर, कधी गावाच्या ठराविक ठिकाणी नारळ द्या सांगायची, लोकं ऐकायची आणि हिच्या सांगण्या प्रमाणेच कृती करायची. किती लोकांचं भल झालं त्यांचं त्यांनाचं ठाव पणं कधीतरी बोलाफुलाची गाठ पडायची, दहातल्या दोन तीन जणांना चांगली प्रचिती यायची, ज्यांना गुण यायचा नाही ते काहीतरी चुक घडली किंवा काहीतरी आडवं आहे म्हणुन गुण नाही आणि आपल्या नशिबाचा दोष समजून गप्प बसतं. आईची प्रत्येक कृती लेकीन लहानपणा पासून पाहिलेली होतीच. म्हातारी थकली . रिटायर होणारा आपल्या हाताखालील कोणाकडेतरी आपल्या कार्याचा भार देतो. प्रशासकिय भाषेत चार्ज देतो. तसं म्हातारीनं आपला हा भार लेकीच्या स्वाधीन केला. एकीचं पाणी दुसरीच्या अंगात उतरविण्याचा एक विधीपणं केला. आता या श्रद्धा की अंधश्रद्धा या वादात आपणं न पडता गोष्ट खरीच आहे. वयोमाननुसार सर्दी तापाच्या साध्या आजारानं म्हातारी मेली. पणं मरताना लेकीकडे आपला वारसा देऊन गेली. गावात लोकांची चर्चा सूरू झाली.

दुसऱ्याच्या शेतात राबून कष्ट करून बायो जगत होती. मिळेल ते खातं होती. आईचा वारसा चालवत होती. दर वाराला , घुमत होती. लोकांच्या अडीअडचणी, समस्या जाणत होती, उपाय सांगत होती. बालपणा पासून केलेल निरिक्षण, बदलत्या काळाची परिस्थिती, तिचा अनुभव, लोकांच्या अचूक समस्या, त्यांची सुखदुःख, अडचणी, कुणाला कोणता उपाय याचं पक्क गणितं तिने केलेलं असावं. त्यामुळं बायोचा अंगारा म्हणजे खात्रीशीर उपाय. असा एक सर्वांचा समज झाला होता. लग्न होऊन दहा बारा वर्ष होऊन गेली पणं बायोचा वंशवेल वाढला नाही. म्हातारीनं जे जपल त्याचं पालन ही नीट करत नाही म्हणूनच हे घडतय अशी कुजबूज असायची. दुर्दैवाने बायोचा बाप तिच्या आईं पाठोपाठ हे जग सोडून गेला.

पंधरा वर्ष लग्नाला झाली, बायकोन ज्यांना अंगारा दिला त्यांना पोरं झालीं आपल्यालाअजून पोरंबाळ नाही, या विचारानं की आकस्मिक आलेल्या मानसिक धक्यान बायोचा नवरा मेला. बायो एकटीच राहिली. पणं तिन आपल भगतगिरीच समाजकार्य बंद केलं नाही. अर्थात यातून तिला काहीं उत्पन्न मिळतं होत असं अजिबात नाही. तिच्याकडे मोठी अदभूत शक्ती होती असंही म्हणता येणार नाही. अशिक्षित बायो नी अशिक्षित समाज यांचं प्रबोधन करणारं तेव्हां कुणी नव्हतं. असं समजून घेऊ या. तीच्याकड कोण येतं होत. ताप, खोकला नी सर्दी झालेले, हा भांडल्या पासून असं होतंय ही समस्या सांगणारे , बयोला सगळ्यांची कुंडली ठावूक होती.लग्नाला दोन तीन वर्ष झालीत पोरं बाळ नाही. आता त्याकाळात तेरा चौदा वर्षाच्या पोरीच लग्न झाल्यावर लग्नानंतर चार पाच वर्षानी मुल होत असतील असं समजून घेऊ. पणं बायोच्या अंगारा कामी आला हा समज.सगळा अडाणी कारभार .जिच्या पोटीपाटी नाही, राहायला घर, अंगावर कपडा, खायला अन्न नाही . पणं इतरांच्या सुखासाठी, की लोकं आपल्याला मानतात यासाठी ती असल काहीं करत असावी. कुणाला लुबाडून आपल भल करावं हा स्वार्थ नव्हता. अज्ञान, अंधश्रद्धा यातलाच तो प्रकार होता. लोकंही सुशिक्षित, खरं खोटं पारखून घेणारी नव्हती तेव्हां सर्दी खोकला साधा ताप दोन तीन दिवसांनी जातो ही जागरूकता नव्हतीच तेव्हां डॉकटर कुठं होते. गोळ्या नी इंजेक्शन द्यायला,इतरांच भल करणारी आज तिच्याकडे काहीच नाही . याचा कुणीच विचार न केल्यानं. स्वतःचं दैन्यदुःख घेऊन, उपाशी राहून, आपल्यात काहीं दैवी शक्ती आहे, लोकं आपल्या दारात येतात आपल्यात देवत्व पाहतात या भ्रमात बायो म्हातारी राहिली . हळूहळू लोकांच्यात जागृती होऊ लागली. तिच्याकडची गर्दी कमी होऊ लागली. कदाचित भगतीन बायोला हे सहन झालेल नसाव. ती मनोरुग्ण झाली, गावात ओरडत फिरू लागली. लोक म्हणायचे हिच्या इसमांचा, हिच्यावर कोप झालाय. बरेच दिवसांनी गावातल्या रस्त्यालगत पडलेली म्हातारी लोकांना दिसली, तिच्या भोवती माश्या घोंगावत होत्या.अंधश्रद्धेच्या खोट्या समजुतीन म्हातारीचा बळी घेतला होता. साऱ्या गावात हळहळ व्यक्त करण्यात आली. तिच्या अंत्ययात्रेला तुफान गर्दी होती. मेल्यापाठी सारेच गाती याची प्रचिती दिसली.

## कोंकण- स्वर्गाहुनी सुंदर...!

प्रा.के. एस. शिरबंदे,
दापोली.

**स्वर्गाहुनी सुंदर,**
**आहे माझं कोंकण..!**
**इथल्या लाल मातीच्या,**
**कणाकणात लपलयं सोनं..!**

22 जून 1978 या दिवशी, अगदी पहिल्यांदाच कोकणात, ए.जी. हायस्कूल, दापोली या ठिकाणी, जुनिअर कॉलेज शिक्षक म्हणून नियुक्ती झाल्यामुळे,पहिले पाऊल ठेवले..! पहिला कोंकण स्पर्श झाला...!

21 जून या दिवशी कोल्हापूर दापोली या एस.टी.ने दापोलीत प्रवेश केला, तत्पूर्वी चिपळूण पासूनच धुवांधार पावसाने दापोलीपर्यंत पाठ सोडली नाही, त्या गर्द झाडीतून व धुवांधार पावसातून, वळणावळणाच्या रस्त्याने,रस्ता नीट दिसत नसतानाही आमच्या एसटी चा ड्रायव्हर,तो कोल्हापूरचा पठ्ठ्या सफाईदारपणे गाडी चालवत होता..! मी बाकी मुठीत जीव धरून बसलो होतो..! एकदाची दापोली आली..! बाहेर पाहतो तर सगळीकडे पाणीच पाणी झाले होते..! रस्त्यावरून पाणी ओसंडून वाहत होते..! इतक्यात छत्री घेऊन शिपाई मला न्यायला आला होता व त्याने मला डायरेक्ट ए.जी. हायस्कूलच्या च्या वस्तीगृहावर घेऊन गेला..! तो मला मध्येच आश्चर्याने विचारला, सर , तुमची छत्री कुठे आहे..! एसटीत राहिली काय..? मी म्हटलं खुळ्या आमच्याकडे गावात एकट्या पाटलाकडे सोडली की छत्री कुणाकडेच नसते..! हे ऐकून तो मोठ्याने हसू लागला..!

असो..! दुसरा दिवस उजाडला, नोकरीचा जॉइनिंग दिवस होता...! हळूहळू पत्ता विचारत दाभोळ रस्त्याने पुढे चाललो.., गर्द झाडी, व धुक्यामुळे रस्त्यावरची वाट कुठेच मला दिसतच नव्हती,मध्येच पावसाची सर सलामी देऊन जायची..!

मला दोन-चार विद्यार्थी रस्त्याने जाताना दिसले, त्यांच्या पाठोपाठ जायचे ठरवले, बारीक पाऊस चालू होता...! मुलांच्याकडे छत्री होती माझ्याकडे नव्हती..! त्यांनी मला मागे वळून पाहिले , व विचारले, तुम्ही नवीन सर आहात काय..? मी हो म्हणालो...! लगेच त्यांनी माझ्या डोक्यावर छत्री धरली व त्या वळणा वळणाच्या, नागमोडी वाटेने,उंच टेकडीवर, आमराईच्या गर्द छायेत वसलेल्या ए.जी. हायस्कूलच्या कार्यालयात न्हेऊन पोचवले..!

...असा हा माझा पहिला कोकण स्पर्श..! फारच रोमांचक व मनाला थोडा सुखावणारा वाटला...! आयुष्यात पहिल्यांदाच एवढा मोठा पाऊस व गर्द झाडी पाहून मी धास्तावलो होतो...!... कधी काळी प्राथमिक शाळेत असताना, कोकणात खूप पाऊस पडतो , तिथे उतरत्या घराची छपरे असतात, तिथले शेतकरी पावसात इरले पांघरून भातची लावण करत असतानाचे चित्र पाहिले होते..! त्याची प्रत्यक्ष अनुभूती आज मला येत होती..!

एवढ्या सलग,आभाळ फाटल्यासारखे पडणाऱ्या पावसात, शाळेत कसे जायचे ? राहण्या व जेवणाची कुठे सोय होणार ? कारण गेल्या दोन दिवसात मला कुठेच हॉटेलं दिसली नव्हती, माझ्यासमोर प्रश्नचिन्ह उभे राहिले होते..! तसेच सततच्या डोक्यावर पडणाऱ्या पावसामुळे कंटाळा येत होता व त्यामुळे गावी परत जाण्याचा विचार वारंवार मनात येत होता..! पण दापोलीच्या संस्था चालकांनी बोर्डिंग मध्ये माझ्यासह आणखीन दोन नवीन शिक्षकांची राहण्याची व जेवणाची घरच्या प्रमाणे व्यवस्था केली..! तिथल्या स्थानिक शिक्षक व शिपायानी आम्हाला खूप सहकार्य केले..! व नंतरच्या काळात आम्हाला कधी घरची आठवण होऊ दिली नाही..!

**कोकणची माणसं साधी भोळी,**
**काळजात त्यांच्या भरली शहाळी..!**

याचा खऱ्या अर्थाने मला प्रत्यय येत होता..! हळूहळू जसे दिवस जातील, तसे मी कोकणात रुळू लागलो...! इथल्या निसर्गाने माझ्यावर कधीच मोहिनी घातली होती..! त्या सुंदर नारळी-पोकळीच्या बागा, सुंदर हिरवी शाल पांघरलेले डोंगर, अथांग समुद्राच्या त्या निळ्या निळ्या लाटा, त्या पावसाळ्यात डोंगर कड्यावरून फेसाळत पडणारे धबधबे..! ती हिरवी गर्द झाडी, त्या झाडावरील असंख्य रंगबिरंगी फुलपाखरे व पक्षी पाहून माझे मन त्या निसर्गासी एकरूप होऊ लागले...!

.... हा वर्षा ऋतु म्हणजे कोकणाला मिळालेलं एक सुंदर दैवी वरदान आहे..! इथला श्रावणातला पाऊस पाहण्यासारखा असतो.! इथले कोसळणारे पांढरे शुभ्र धबधबे,सलग अखंड वाहणाऱ्या नद्या, नाले मन प्रसन्न करून जातात..!

कोकणातली पुरातन मंदिरे, इथले ऐतिहासिक जंजिरा व सिंधुदुर्ग सारखे समुद्रातील किल्ले, सागरी किनारे, सुरुची बने, सुंदर बीचेस, त्यावरील सुंदर चंदेरी वाळू, बीच वरील विलोभनीय सूर्यास्त ,तसेच नारळी पोफळीच्या गर्द झाडीत लपलेली लाल मातीची कौलारू घरे, आपले चित्त आकर्षित करून घेतात..! व साक्षात स्वर्गाची अनुभूती देतात..!

कोकणात सृष्टी सौंदर्य विपुल आहेच, पण त्याशिवाय कोकणातल्या या लाल मातीने देशाला... पां.वा.काणे, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी व रँगलर परांजपे च्या रूपाने पाच भारतरत्ने या कोकण भूमीने भारताच्या पदरात टाकली..!

"**कोकण दरिद्री बोलते कोण,**
**छे,छे,ती सुंदर सोन्याची खाण..!**"

**( पान १० व्रर )**

# काव्यांगण

## पहिला पाऊस

आकाशी गर्द काळे ढग,
दाटूनि आले आज,
पावशा पक्षीही आज,
पाऊस आला,पाऊस आला,
पेरते व्हा,पेरते व्हा,
म्हणूनी बळीराजाला,
कर्ण मधुर साद
घालू लागले...!

मोरही आपला निळा
पिसारा फुलवूनि,
आंब्याच्या त्या बनी,
थुई थुई नाचू लागले...
उन्हानी करपलेली गल्लीतली,
काळी पोरंही आता,
चिंब भिजायचं म्हणूनि,
आनंदाने नाचू लागले...!

विजेच्या कडकडात,
ढगांच्या गडगडात,
आकाशातूनी जलधारा
आता बरसू लागल्या..
तहानलेलं शिवारही,
आता गट्ट गट्ट पाणी,
पिऊ लागले....!
बळीराजालाही आता
हिरवे स्वप्न,
पडू लागले....!

पहिल्या पावसाचे
पिवळं गढूळ पाणी,
डोंगर माथ्यावरूनी
खाली झिरपत येते ...
पोषण भरण होता,
धरती मातेचे...
पोटातूनी तिच्या
हिरवे पिवळे,
दुर्वांकुर फुटू लागले..!

**प्रा.के. एस. शिरबंदे,
दापोली**

## पहिला पाऊस

नभात उतरले जलद अलगद
धरती सुखावली पाहुनी ढग
वाऱ्याने घातली हळूच शीळ
तयारी केली बिजलीने जलद ।

उसासे ऐकून धरणी प्रियेचे
सूर्याने घेतला निरोप धरेचा
दडला आकाशी हसत हसत
जलद सुखाने आले बहरून ।

सुखावली धरती चिंब धारेत
सरी वर सरी कोसळती धरेत
पक्षी सुखावूनी येती तरुवर
करती स्वागत जल झटकून ।

बळीराजा हसेल नभी पाहून
शेतात नाचेल आनंद विभोर
झाडे पाने सारी
मनाचा मोर नाचेल थयथय
अंगावर झेलत पहिला पाऊस
भिजून चिंब नाचती तारुण्य
करूती स्वागत पहिला पाऊस ।

पाऊस उतरेल कवीच्या मनात
पाऊस उतरेल रंगांच्या रेषेत
पाऊस उतरेल विरहिणीत
मनाच्या कप्प्यात दडे डोळ्यात ।

**चित्रा अविनाश नानिवडेकर.**

## पाऊस, नक्की कसा?

कधी मुसळधार
कधी संततधार
कधी नुसतीच सर

कधी गडगडाट
कधी कडकडाट
कधी येशी मुकाट

कधी थेंब टपोरा
कधी पाडशी गारा
कधी सरीचा मारा

कधी वाटे हवासा
कधी वाटे नकोसा
नक्की असशी कसा?

रुपे तुझी किती नाना?
प्रश्न पडे माझ्या मना
पावसा, उत्तर देशील ना?

**दीपक गुंडये,
मुंबई**

## पाऊस पान्हा

आल्या पावसाच्या धारा
भिजवित चिमणी पाखरा ।
ओल्या पावसात चिंब
होई कासावीस जीव ।
ओल्या पावसाची सर
पागोळ्या फुटती पाझर ।
ओल्या पावसाची धार
खेळवत अंगावर..।
दारातला पिंपळ
भिजुनी झाला चिंबगार ।
ओल्या पिंपळास गार
फुटे पालवी लालसर ।
मातेला भरून यावा
जणू वात्सल्याचा उर ।

**विजय गंगाराम गोवेकर
(घाडीगांवकर),
सिंधुदुर्ग**

## पहिला पाऊस.....

पाऊस आला मोद झाला
तृषार्त जीवाला गारवा लाभला
देह मनालाही तजेला आला
पहा ना पहिला पाऊस आला!!१!!
चातक सुखावला सृष्टी नहाली
गारव्याने सुखद रंगत आणली
असह्य उकाडा तोही पळाला
अवनीही मग पुलकित झाली!!२!!
झाडावेलींना स्वच्छ चकाकी आली
सर्व सजीवांना निखळ तृप्ती मिळाली
सगळीकडे मुग्ध प्रसन्नता विलसली
पहिल्या पावसाने ही किमया केली!!३!!
पहिला पाऊस आला झर झर
सरीही बरसल्या सर सर
मयुरही हर्षे नाचले भर भर
आम्ही भिजलो बागडलो अंगणभर!!४!!
अशीही वर्षेची मौजच न्यारी
दरवर्षी नित्य नूतन अनुभवली
तरीही अनोखी ओढ वृद्धिंगत झाली
पहिल्या पावसाची रंगतच प्यारी!!५!!

**सुखदा सयाजीराव गोरड,
दापोली**

## पावसाची बेरीज-वजाबाकी

असे कसे ?हो मोजमाप करता
मी तर आहे अल्लड पावसाळा
मी येतां तुम्ही विसरता उन्हाळा
असे कसे ? हो मोजमाप करता

नदी पल्याड तुझे टुमदार गांव
माझ्या मुळेच तु वल्हव नाव
नावेत बसुन खुश्शाल गाठ गाव
पुन्हा करू नको मोजमाप राव

मला हात जोडु लागला कधी
तु तर केलीस फसवणुक आधी
आधी मधी मी कोसळती कधी
तुच तर लागलास माझ्या नादी

नाद बीद हे सगळ सोडुन दे
बरसताना तु मला पाहुन घे
मोजत बसलास तर राहु दे
अवखळ पणा मला माझा घेवुन जाऊ दे

मोकळे करतोस रान सारे
असा मोजत बसु नको रे
तुझी प्रगति त्यातच माझे हित रे
मन पंखावर बसुनी बरसतो रे

बेरीज वजाबाकी करू नको रे
माझे बरसने तु साठवं रे
साठवं पण आठवं मला रे
चिंब भिजुनी जग मोहरू दे

**सौ. निर्मला श्रीनिवास देऊसकर,
वेंगुर्ला**

## पाऊस

जसा गोडवा ऊसाचा
तसा गोडवा पावसाचा
घेऊन आला पाऊस पाणी
थेंबे थेंबे बरसे पाणी
पावसाच्या येण्याने हर्ष वाटे
हिरवळ धरती मनी दाटे
घन काळे गगनी दाटीने
श्वास मुद्रेचा खुलवी मनी
मिरगाच्या पावसाचा तोरा मोठा
भोजन असे तिखट सन्नाटा
गरम झाले शरीर उस्मानाबाद
शीतल केले मेघ सुरीने
लहान थोरा वाटे आनंदा
लगबगीने जाती कामा
सोबती असे वरुण राजा
सुखाने वाजवा सदा बाजा

**सौ. प्रिया सावंत,
सावंतवाडी**

## सोड मृताची सर...

जीव कासावीस होतो
किती सोसू मी चटके
येग धावत अंगणी अंग
भिजव नटके नदी
विहिर आटली नग्न
कपारी डोंगर ओढ
तूझ्या गं येण्याची लावी
घामाची ही धार
तळमळ करी जीव मम
पाऊले चालता दिस
भरले मासाचे नको
दुराऊस आता साद
घालितो आभाळी सोड
अमृताची सर नको
क्रोधाने पाहूस जरा
उघडावे दार कोमेजली
झाडवेली चिऊताई
शांत झाली दिन रडवतो
रोज रात्र अंगाची
कायली नको बाई थट्टा
करू येग धावत अंगणी
शालू नेसवून नवी श्रृष्टी
सजव गं राणी --------
-----------------

**कवि -लेखक.
अविनाश लाड,
राजापूर -हसोळ**

## आला पाऊस पाऊस

आला पाऊस पाऊस
सरीवर सरी येती
गंधाळल्या मातीसंगे
शहारती गोड नाती

नाते माया ममतेचे
बीज विसावे मातीत
जणू मायेची पाखर
लेक मातेच्या कुशीत

येता पाऊस सुगंधी
पान फुल शहारते
दहाडत्या ढगाआड
पाते विजेचे दडते

होतो उत्सव साजरा
पशुपक्षी तृप्त होती
पावसाच्या धारेसंगे
घरट्यात विसावती

रिमझिम पावसात
प्रेम फुले मनोमनी
प्रिया धरेला भेटाया
आला पाऊस फिरुनी

**सौ. सपना सावंत,
दापोली**

## मीरग हल्ली सुकोच जाता!

आभाळ रोज भरान येता
पाव्स लय पडात वाटता
ढग फुडे सरकत जाता
मीरग हल्ली सुकोच जाता...

पुर्वी कसो पाव्स व्हतो
मीरग कसो म्होवरायचो
दर वरसां मीरगा दिवशी
पाव्स कसलो वतायचो!
पुर्वीचो पाव्स डोळ्यांर दिसता
मीरग हल्ली सुकोच जाता...

राखाण झाली, नियेद झाले
उडवे बिडवे ढाकून झाले
पडवी, वसरी, गोठे कुडले
पावसासाठी कौल लावले
देव पण आता फाट्यार मारता
मीरग हल्ली सुकोच जाता...

शेळीचे तरवे पेरुन झाले
बुचडेर गुठे फिरवून झाले
नांगर, रुमणें जोडून झाले
कांबळ्याक दशयें घालून झाले
पेवगो पेवगो जरी बोलवता
मीरग हल्ली सुकोच जाता...

बावडे आटले, धरणां आटली
हांडोभर पाणयाची पंचाय्त झाली
भांडान भांडान तोंडा सुकली
झाडां पेडां जीवाक मुकली
डोळ्यां डोळ्यांतना टीपुस गळता
मीरग हल्ली सुकोच जाता...

निसर्गाचा चक्र बदालला
सगळा उलटा फिराक लागला
कधीय न्हिबार, कधीय पाव्स
घडा नये ता घडाक लागला
कर्माची फळा भोगुक लावता
मीरग हल्ली सुकोच जाता...!

**बाबू घाडीगांवकर**

## प्रथम सरी

ग्रीष्मात त्रास तप्त उन्हाचा
"त्राही माम्" आक्रोश प्राणीमात्रांचा
अंत करी पाऊस पहिलावहिला
निसर्गाने जो भूमी चरणी वाहिला
धरित्री पहा कशी सुखावली
आनंदित अन् पल्लवित झाली
कोंब अपत्ये त्या माती काळीचे
बनती हरित मखमली गालिचे
फुलेफळे हळदकुंकू तिच्या भाळीचे
जल निर्झर ओढे नद्या नालीचे
अश्रू पर्वतांच्या गालीचे
क्षारयुक्त डाग त्यांच्या चालीचे
"जीवन"दान त्या वनमालीचे
अर्पण कृपाळुस नैवेद्य थाळीचे

**डॉ. प्रेमा मेणशी,
बेळगावी-कर्नाटक**

# काव्यांगण

## आला पाऊस पाऊस

आला पाऊस पाऊस
सरीवर सरी येती
गंधाळल्या मातीसंगे
शहारती गोड नाती

नाते माया ममतेचे
बीज विसावे मातीत
जणू मायेची पाखर
लेक मातेच्या कुशीत

येता पाऊस सुगंधी
पान फुल शहारते
दहाडत्या ढगाआड
पाते विजेचे दडते

होतो उत्सव साजरा
पशुपक्षी तृप्त होती
पावसाच्या धारेसंगे
घरट्यात विसावती

**रिमझिम पावसात**
**प्रेम फुले मनोमनी**
**प्रिया धरेला भेटाया**
**आला पाऊस फिरुनी**

**सौ. सपना सावंत,**
**दापोली**

## पहिला पाऊस

पहिला पाऊस बरसे
तसा आनंद दरवळे
हिरवळ चोहीकडे
मुक्त फिरू मज वाटे

ताजी ताजी हवा मज
जशी मज स्पर्श करे
मोर डौलदार नाचे
तसा मनी मोद दाटे

नाजूक नाजूक फुले
पान तयासवे खेळे
करी हळुवार स्पर्श
मन तिकडेच वळे

सांगू सांगू कोणा कोणा
पहिला पाऊस आगळा
छंद त्यात माझा पहा
चहा पिण्याचा जपला

गेली सारी जळमटे
भासे नवीन वागणे
धुंद करून मस्तीत
वर्षा राणीचे नाचणे

**स्वाती विष्णु नष्टे**

## पहिला पाऊस

मृगारंभी गरजत बरसत
जात्याची घरघर करणारा
वीजध्वनींचे भय दर्शवित
हमी आगमनाची देणारा

श्वासात मृदगंध दरवळवुन
अवखळ बेधुंद करणारा
गारठवतो उष्म्यास जरी
अंगनसांत ज्वर भारणारा

कष्टल्या अवनीस मानाचा
शालू हिरवा बक्षीणारा
कोरड पडल्या गात्रांना
संजीवक पाझर देणारा

आश्लेषातल्या मरगळीस
श्रावणात उन्मेष आणणारा
कृष्णमेघातून श्वेतकिरणांचे
सप्तरंगी इंद्रधनु करणारा

पहिला पाऊस कधी नको
कधी हवाहवासा वाटणारा
जन्म-मृत्यूच्या दरम्यान जीवनी
शिशिर्वासंतिक सख्य साधणारा

**उदय दुदवडकर,**
**तळेरे- कणकवली**

## पहिला पाऊस

नभी काळोख दाटला
वारा शितल सुटला
पहिल्याच पावसाचा
बडीमार चालु झाला

विजा फार चमकल्या
झाला ढगांचा आवाज
नित्य पडता पाऊस
चढे सृष्टीला हा साज

पशु पक्षी सुखावले
झाली शितल धरती
पहिल्याच पावसात
मुले खुशीत नाचती

विहिरीला पाणी आले
प्रश्न पाण्याचा सुटला
पहिल्याच पावसाची
खरी खुशी मानवाला

ओली चिंब भिजल्यानं
गंध मातीला सुटला
बळीराजा मनोमनी
फार खुशीत नाचला

**सुरेंद्र सकपाळ,**
**त्रिंबक- मालवण**

## पाऊस, नक्की कसा?

कधी मुसळधार
कधी संततधार
कधी नुसतीच सर

कधी गडगडाट
कधी कडकडाट
कधी येशी मुकाट

कधी थेंब टपोरा
कधी पाडशी गारा
कधी सरीचा मारा

कधी वाटे हवासा
कधी वाटे नकोसा
नक्की असशी कसा?

रुपे तुझी किती नाना?
प्रश्न पडे माझ्या मना
पावसा, उत्तर देशील ना?

**दीपक गुंडये,**
**मुंबई**

## थेंबांची गंमत!

पहिला पाऊस आला रंगत
थेंबा थेंबाची गंमत सांगत !

त्याची ऐका हो पहिली गंमत
ऐकताना येईलही रंगत
जेव्हा थेंब जमिनीत जिरतो
बेडकांच्या तो घरात शिरतो
तशी बेडकांची झोप उडे
आणि गातात बेडूक पाढे !

त्याची ऐका हो दुसरी गंमत
ऐकताना येईलही रंगत
जेव्हा थेंब हवेतच विरतो
बाष्परूपात सर्वत्र फिरतो
तशी वाढते आर्द्रता हवेत
घेती ढग अलगद कवेत !

त्याची ऐका हो तिसरी गंमत
ऐकताना येईलही रंगत
जेव्हा थेंब पानावर उडतो
घसरगुंडी करूनच पडतो
तसे उडती हवेत तुषार
होई हवाही मस्त गारगार !

त्याची ऐका हो चौथी गंमत
ऐकताना येईलही रंगत
जेव्हा थेंब मातीत मिसळतो
सुगंधित होऊन तो घुसळतो
तशी हवा होते गंधीत
मन वेडावते त्या धुंदीत !

**राज भिंगारे,**
**खेड**

## दहाव्याचा विधी

**( पान ८ व्रून )**

सर्व विधी सिद्धीस नेण्यासाठी आणि दिवंगताच्या प्रेतत्त्व निवृत्तीच्या फलप्राप्तीसाठी सर्व स्थापित देवता आणि पिंडासह उदक कुंभ या सर्वांची प्रार्थना करावी.

पश्चिमेकडील वायस पिंड कावळ्याने स्पर्श करून भक्षण करावा म्हणून पुढील मंत्र म्हणून प्रार्थना करावी-

' यमोसि यमदूतोसि वायसोसि नमोस्तुते । सप्तजन्म कृत्तं पापं पिंडं भक्षंतु वायस:। '

प्रत्यक्षात कावळ्याने पिंडाला स्पर्श केला नाही तर दर्भाचा कावळा करून पुढील मंत्रांनी त्याचा पिंडाला स्पर्श करावा.

**' सुतकांती बलिं स्पृस्टा: बलिं भक्षंतु वायस:।**
**सर्वे प्रेतत्व निर्मुक्ता: शाश्वतिं गति माम्नयु: ।। '**

काकस्पर्शानंतर सर्वांनी अश्म्यावर तिलांजली द्यावी. वेदिका,स्थापित देवता, पिंड आणि उदक कुंभ या सर्वांची उत्तरपूजा करून सर्वांवर विसर्जनाच्या अक्षता द्याव्यात. सर्व पिंडांना व उदक कुंभांना दर्भ लावून विसर्जित करावे. अश्म्यास तिळाचे तेल लावून पुढील मंत्र म्हणून अश्मा दक्षिणेकडे तोंड करून डाव्या खांद्यावरून मागे पाण्यात सोडावा.

**' अश्मा पाण्यात सोडण्याचा मंत्र:- '**
**'इहलोकं परित्यज्य गतोऽसि परमां गतिम्।**
**गतोसी दिव्य देहेन कुशित्वाहं नियोजये।।**
**शिलायां प्रेतरुपोसि अंतश्चरत साक्षिवत् ।अर्चयित्वा दशाहंतं स्वस्थाने गम्यतां सुखम् ।।**

इथे दहाव्या दिवसाचे कार्य संपल्यानंतर सर्वांनी स्नान करावे.

अनेक मंत्रक्रिया सुव्यवस्थित समजण्यासाठी आणि साधण्यासाठी तज्ञ पुरोहितांचे मार्गदर्शन मिळवणे अधिक सोयीचे होईल.

**श्री कालार्पणमस्तु |**

## कोंकण- स्वर्गाहुनी सुंदर...!

**( पान ८ व्रून )**

ही कविता मराठी शाळेत असताना वाचली होती,त्याची प्रचिती आज मला येत आहे....शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, सुंदर निसर्ग फणसासारखी मधाळ माणसं हे सारं कोकणाचं वैशिष्ट्य आहे...! जे जे तुम्हाला तुमच्या स्वप्नातील स्वर्गात मिळतं, ते ते सर्व काही इथे तुम्हाला मिळतं..! म्हणूनच आपण कोकणाला प्रतिस्वर्ग असे म्हणतो...!

.... माझी जन्मभूमी जरी घाटावरची असली, तरी माझी कर्मभूमी ही कोकण आहे..! म्हणून मी स्वत:ला परम भाग्यवान समजतो.... या लेखाचा शेवट करताना, मी असे म्हणेन की....!

**डियर कोकण..!**
**या धावपळीच्या जीवनामध्ये,**
**तूच एक शांततेचे, सुखाचे**
**आणि आनंदाचे ठिकाण आहेस..!**

.....माझ्या कोकणवासी मित्रांनो, कोकणच्या प्रति स्वर्गामध्ये सुख, शांती, व आनंद टिकवायचा असेल तर प्रथमतः सर्वांनी आपला सातबारा सुरक्षित ठेवा व नंतर पुढील गोष्टीकडे आपण लक्ष द्यावे...! नंबर (01-) आपण पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन केले पाहिजे..! त्यासाठी प्रत्येक नागरिकांनी प्रत्येक मान्सून मध्ये, दरवर्षी किमान दोन झाडे लावून ती जगवली पाहिजेत..! नंबर (02)- गावागावांत सामाजिक वनीकरण मोहीम राबवली पाहिजे..! नंबर (03)- पाणी हे जीवन आहे, जलही जीवन है...! या उक्तीप्रमाणे आपण सर्वांनी पाणी अडवा व पाणी जिरवा ही मोहीम सामूहिक रित्या राबवली पाहिजे...!

असे झाले तरच..! ही कोकणची सुंदर हिरवाई व सौंदर्य कायम टिकून राहील...! व हा आपला कोकण रुपी स्वर्गाचा आनंद पुढील येणाऱ्या अनेक पिढ्यांना चिरंतर देता येईल असे मला वाटते...!

बालजगत

## पहिल्या पावसाची उत्सुकता

मुख्य ऋतू तीन असतात. उन्हाळा पावसाळा आणि हिवाळा. सर्व मुलांना उन्हाळा ऋतू आवडतो कारण त्या ऋतूमध्ये उन्हाळी सुट्टी असते. मग शाळेला सुट्टी म्हणून मुलांना उन्हाळा ऋतू आवडतो. उन्हाळ्यानंतर पावसाळा ऋतू येतो. जसा पावसाळा ऋतू आला की शाळा सुरू झाल्या. मग मुलांना शाळेत नवीन वर्गात जाण्याची उत्सुकता असते. मुलांना उन्हाळ्या सारखाच पावसाळा ऋतू सुद्धा आवडतो. पहिल्या पावसाची उत्सुकता तर सर्वांनाच असते. मस्त अशा पावसाळ्यात गरमागरम चहा तर खूपच छान आणि जर चहा सोबत पावसाळ्यात गरमागरम भजी असले तर सर्वांनाच आवडते. पहिल्या पावसात भिजण्याची जी मज्जा आहे ती तर मोरी मधल्या शावर पेक्षा पण भारी. मुले तर जसा पाऊस सुरू झाला तसं पावसात भिजायला जातात. कधी जर पाऊस नाही आला तर पावसाचं गाणं म्हणत पावसाला बोलवतात.

'येरे येरे पावसा तुला देतो पैसा पैसा झाला खोटा पाऊस आला मोठा!'

हे गाणे तर तुम्हा सर्वांना माहितच असेल. हे गाणं तर सर्वांच तोंडपाठही असेल. हे गाणं मुलांना खूप आवडतं. मुले हे गाणं वाजत उड्या मारत मारत पावसाचं स्वागत करत असत. मग पावसाला पण खूप छान वाटत असेल. मग मुलांना खुश करण्यासाठी पाऊस जोरात पाऊस पडत असे.

'ए आई मला पावसात जाऊ दे, एकदाच ग भिजूनी मला चिंब चिंब होऊ दे!'

पाऊस पडू लागला की, लहानपणी मला पावसात भिजावेसे वाटत असे पण माझी आई मला पावसात भिजू देत नसे.कारण पावसात भिजल्याने आपण आजारी पडतो. सर्दी ताप खोकला हे आजार होतात. म्हणून आई मला पावसात भिजू देत नाही.प्रत्येक मुलाच्या आईला पण आपापल्या मुलांची काळजी असते. पण आईला आपण कसना कसं तरी मनवायचो आणि पावसात भिजायचो.

**'म्हातारी हरभरे भरडते**
**ढगात गड्गड् गड्म**
**थेंबा सोबत वीज कोसळे**
**कड्म कड्कड् कड्म'**

पाऊस पडण्याच्या आधी आकाशात गडगडण्याचा आवाज येतो.तेव्हा आपण खूप घाबरतो आणि आईच्या कुशीत जाऊन झोपी जातो. पाऊस पडताना मध्येच वीज चमकू लागते तेव्हा असं वाटतं की आकाशात लाईट लावलेली आहे. मला यावर्षीच्या पहिल्या पावसाची खूप उत्सुकता आहे.



**कु. पुर्वा सचिन जगदाळे,**
**चंद्रनगर, ता. दापोली.**

## पहिला पाऊस आणि धावपळ!

सर्वांनाच पावसाळा हा ऋतू खूप आवडतो. विशेष करून लहान मुलांना. पहिला पाऊस आला की लगेच आठवणारे गाणे म्हणजे,

**येरे येरे पावसा,**
**तुला देतो पैसा.**
**पैसा झाला खोटा,**
**पाऊस आला मोठा.**

पहिला पाऊस पडला की लहान मुले लगेच कागदाच्या होड्या बनवतात. उनहाळ्यात सर्व माणसे जंगलात जाऊन लाकडे तोडतात आणि सर्व लाकडे घरी आणतात. आणि अंगणात किंवा खोपटीत ठेवतात. कारण पावसाळा आला की आपल्याला चूल पेटवायला लाकडे लागतात. म्हणून आधीच लाकडे आणून ठेवतात. म्हणून तर अंगणात लाकडे ठेवतो. पण नंतर कधी रात्री अचानक पाऊस पडतो. नंतर त्या लाकडावरती प्लास्टीक ठेवायला नुसती धावपळ सुरू असते. पहिला पाऊस आला की मातीचा छान वास येतो.

शेतकऱ्यांचं मन आनंदाने भरून येते. मोर थुई थुई नाचू लागतात. लहान मुले पावसात नाचतात. कोकणातल्या लोकांची खेकडे पकडायची धावपळ सुरू होते. पहिला पाऊस आला की शेतकरी खऱ्याअर्थाने मनापासून आनंदी होतात. आणि लगेच शेतात जाऊन काम करायला सुरुवात करतात.

**कु. वेदिका सुभाष मुलूख,**
**चंद्रनगर, ता. दापोली.**





## पहिल्या पावसाची मजा!

कु. स्वानंदी हरेश मोहीत,
कोंगळे, ता. दापोली.



आज बऱ्याच दिवसांनी काहीतरी लिहावेसे वाटत आहे. पण काय आणि कोणत्या विषयावर लिहावं तेच सुचत नाही. तसं म्हटलं तर लिहीण्यासारखे विषय तर भरपूर आहेत. पण कशावर लिहू ते ठरत नाहीय. आज हाच विचार करत मी आमच्या अंगणातल्या झाडाखाली बसले होते. आजचं वातावरण थोडसं ढगाळ होतं. मधून मधून जोराचा वाराही वाहत होता. असं वाटत होतं की एक सेवक आपल्या राजाच्या आगमनाची सर्व प्रजाजनाना खबर देत आहे. राजाच्या आगमनाचा संदेश यावा तसंच काहीसं हे वातावरण होतं. एकंदरीत आता पहिल्या पावसाची चाहूल सुरु झाली होती. आणि काही क्षणातच ही चाहूल खरी ठरली.

ढगांच्या ओंजळीतून अलगद बाहेर पडून झाडांच्या पानाना धक्के देत एक टप्पोरा थेंब माझ्या हातातल्या पेनावर पडला आणि खऱ्या अर्थाने माझ्या लेखणीला आयताच विषय मिळाला! पुढे पुढे पावसाचे थेंब वाढत गेले. थेंबांच्या चक्क धाराच बरसू लागल्या. माझे मन तर या पहिल्या पावसाने मोहरुनच गेले.

आपणा सर्वांना माहीत आहेच की प्रत्येक माणसाला दरवर्षीच्या पहिल्या पावसाची किती अपुर्वाई असते. एका शेतकऱ्यासाठी तर पहिला पाऊस अमृतानुभव असतो तर एखाद्या प्रियकर प्रेयसीसाठी हा पहिला पाऊस म्हणजे प्रेमाचा वर्षाव असतो. हाच पहिला पाऊस कधी निसर्गाच्या रम्यतेचं रहस्य असतो तर कधी हाच पहिला पाऊस एका लेखकासाठी लेखन सोहळा असतो. ग्रीष्माच्या उन्हात तापून निघालेल्या तप्त धरणीसाठी तो संजीवन असतो तर करपून गेलेल्या एखाद्या झाडासाठी नव पालवी असतो. अशीच पालवी पहिल्या पावसात लेखकाच्या लेखणीलाही फुटते. पालवीच काय, धुमारेही फुटतात. पहिल्या पावसाच्या साक्षीनेच त्याचे अंतर्मनातले ओथंबलेले शब्द कागदावर उमटतात. आता माझीही अवस्था साधारण तशीच झालीय.

तशी तर पहिल्या पावसाची अनेक रुपं आहेत. ही रुपंच निसर्गाला आणखी सुंदर व रम्य बनवतात. पहिल्या पावसाच्या येण्यानं सजीव सृष्टी आनंदात न्हाऊन जाते. चहुबाजूंनी पसरलेली हिरवाई, खळखळ वाहणारे निर्झर , हिरवा शालू पांघरलेले डोंगर आणि शेतात डोलणारी पिकं हे सारं पाहताना निसर्ग स्वतःच स्वतःचं चित्र काढत आहे की काय असं वाटतं. खरंतर पहिला पाऊस सृष्टीत अद्भुत चमत्कारच घडवतो.

खरंच मला वाटतं की, दरवर्षीचा पहिला पाऊस ही संवेदनशील माणसासाठी कल्पनेच्या पलीकडची कल्पना आहे. कारण हा पाऊस दरवर्षी येत असला तरी एखाद्या प्रतिभावान लेखकाला किंवा कवीलाही तो शब्दात बांधणं कठीण आहे. शेवटी इतकंच म्हणू शकते की, हा पहिला पाऊस म्हणजे सृष्टीच्या नवनिर्माणाचा एका प्रकारे शुभारंभच आहे.



## कु. शमिका नयनेश मुलूख, चंद्रनगर, ता. दापोली



### आला पाऊस

आला पाऊस पाऊस
दहा दिशा शहारल्या
जसे हुंडारे वासरू
पाही आईला पान्हेल्या

आला सुवास सुवास
उजळला असा गाभा
आले शेत बहरुनी
त्याची सोनसळी आभा

आला पाऊस पाऊस
विजा कडाड करती
पाने फुले सुखावून
ताल आनंदे धरती

आला सोसाट्याचा वारा
फेर धरतो पाचोळा
कोणी भीतीने शहारे
पाणी गरीबाच्या डोळा

विरहिणी कुणी गाते
येता आभाळ भरून
शब्द विरून जातात
राही भावना व्यापून

**सौ. गौरी यशवंत पंडित,**
**वेंगुर्ला- सिंधुदुर्ग**